बी.एम. प्रतिष्ठान
बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड शनिवार,दि.१९ऑक्टोबर २०२४ | वर्ष४रे | अंक७७वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# महाराष्ट्रात कोण बाजी मारणार!

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

केंद्रीय निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी १५ ऑक्टोबर रोजी पत्रकार परिषदेत महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची घोषणा केली आणि राजकीय वर्तुराचा रागरंगच बदलून गेला. जागावाटप आणि उमेदवारीवाटप या दोन्ही प्रक्रियांनी वेग घेतला आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत २८८ मतदारसंघात मतदान होणार असून प्रत्येक मतदारसंघातील पक्षीय बलाबलानुसार जागावाटप व उमेदवार निश्चितीची गणितं लावली जात आहेत. मात्र, महाराष्ट्रातल्या अशा ३१ जागा आहेत, जिथे सत्ताधारी आणि विरोधक अशा दोन्ही आघाड्या काठावर आहेत. त्यामुळे या ३१ जागा यंदाच्या निवडणुकीत किंगमेकर ठरण्याची शक्यता आहे.कोणत्या पक्षाची किती ताकद आहे हे त्या त्या पक्षाच्या लोकप्रतिनिधींच्या संख्येवरून ठरतं. मात्र, त्याचबरोबर त्या लोकप्रतिनिधींना मिळालेल्या मतांच्या आधारावरही ठरवलं जातं. त्यासाठी याआधीच्या निवडणुकांमध्ये संबंधित पक्षांना मिळालेल्या मतांची आकडेवारी आधारभूत मानली जाते. त्याचाच विचार करता २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत तब्बल ३१ मतदारसंघ असे आहेत, जिथे विजयी व पराभूत उमेदवारांमध्ये मतांचं अंतर पाच हजारांहून कमी होतं! त्यातही या ३१ मतदारसंघांची विभागणी सत्ताधारी व विरोधकांमध्ये जवळपास समसमान अर्थात १६ आणि १५ अशी आहे. त्यामुळे या ३१ मतदारसंघांवर सगळ्यांचं लक्ष असेल. अवघ्या महिन्याभरात निवडणुका पार पडणार असून त्याअनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. आकडेवारीचा अभ्यास करूनच हे पक्ष जागावाटपाच्या व उमेदवार निश्चितीच्या चर्चा करत असून त्यानुसार येत्या काही दिवसांत नेमकं राजकीय चित्र स्पष्ट होऊ शकेल.

मतविभागणी जवळपास समसमान | ‘काठावरच्या’ मतदारसंघांत कुणाची होणार सरशी? | राजकीय वर्तुळाचा रागरंगच बदलून गेला | सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली




## महाराष्ट्रात ३१ जागांवर ‘खेला’

### लोकसभा निवडणुकीची आकडेवारी काय सांगते?

यंदाच्या लोकसभा निवडणुकी महाविकास आघाडीनं ३१ जागांवर विजय मिळवला असून सत्ताधारी महायुतीकडे अवघ्या १७ जागा गेल्या. त्यामुळे राज्यात मतदारांचा कौल विरोधकांच्या बाजूने असल्याचं गणित राजकीय विश्लेषक मांडू लागले आहेत. आकडेवारीचा विचार करता महाविकास आघाडीकडे असणाऱ्या ३१ लोकसभा मतदारसंघांनुसार एकूण १५८ विधानसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीचं प्राबल्य आहे. तसं झाल्यास १४५ हा सत्तास्थापनेचा जादुई आकडा महाविकास आघाडी सहज गाठेल. तर दुसरीकडे महायुतीकडे असणाऱ्या १७ जागांनुसार त्यांच्याकडे १२५ विधानसभा मतदारसंघांमध्ये प्राबल्य आहे.दोन्ही आघाड्यांमधलं अंतर ३३ विधानसभा मतदारसंघांचं आहे. त्यातल्या ३१ मतदारसंघांमध्ये अवघ्या पाच हजार मतांनी विजय किंवा पराभव घडून आले आहेत. त्यात मुंबईतील अंधेरी पश्चिम व मालाड पश्चिम ते पालघरमधील डहाणू आणि बीडमधील माजलगाव अशा मतदारसंघांचा समावेश आहे. त्यामुळे या काठावरच्या मतदारसंघांमध्ये निकाल कोणत्याही बाजूने लागण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे हे ३१ मतदारसंघही दोन्ही बाजूंना जवळपास समसमान आहेत. त्यातील १६ मतदारसंघांमध्ये मविआ तर १५ मतदारसंघांमध्ये महायुती आघाडीवर आहे. अर्थात, १६ मतदारसंघांमध्ये महायुतीचा विजय झाला असला, तरी मविआचे उमेदवार पाच हजारांहून कमी मतांनी पिछाडीवर होते. तर दुसरीकडे १५ मतदारसंघांमध्ये मविआचा विजय झाला असला, तरी महायुतीचे उमेदवार पाच हजारहून कमी मतांनी पिछाडीवर होते.

### ३१ मतदार संघांची पक्षनिहाय आकडेवारी काय सांगते?

काठावरच्या ३१ मतदारसंघांचं पक्षनिहाय गणित पाहिल्यास भाजपा ९ ठिकाणी आघाडीवर तर ११ ठिकाणी पिछाडीवर आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे) ५ ठिकाणी आघाडीवर तर ५ ठिकाणी पिछाडीवर आहे. राष्ट्रवादी (अजित पवार) एका ठिकाणी आघाडीवर आहे. दुसरीकडे मविआमध्ये काँग्रेस ८ ठिकाणी आघाडीवर असून ६ ठिकाणी पिछाडीवर आहे. राष्ट्रवादी (शरद पवार) २ ठिकाणी आघाडीवर तर २ ठिकाणी पिछाडीवर आहे. तर शिवसेना (उद्धव ठाकरे) ६ ठिकाणी आघाडीवर तर ६ ठिकाणी पिछाडीवर आहे.

## सिद्दीकी हत्याप्रकरणी पाच जण अटक

**तपास:**गोळीबार करणाऱ्यांना पिस्तुल पुरवल्याचा आरोप



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई : माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्या प्रकरणात गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत डोंबिवलीतील सराईत गुन्हेगार नितीन सप्रे याच्या टोळीचा सहभाग उघड झाला आहे. त्यानुसार, गुन्हे शाखेने सप्रेसह त्याच्या अंबरनाथ आणि पनवेल येथील साथीदारांना अटक केली आहे. आरोपींनी सिद्दीकी यांच्यावर गोळीबार करणाऱ्या आरोपींना शस्त्र पुरविल्याचे उघड झाले आहे. तसेच सिद्दीकी यांचे मारेकरी आरोपींसोबत कर्जत येथे वास्तव्यालाही होते, असे समजते.डोंबिवलीतील सराईत गुन्हेगार नितीन सप्रे (३२) याच्यासह अंबरनाथमधील संभाजी पारधी (४४), प्रदीप दत्तू ठोंबरे (३७) चेतन दिलीप पारधी (२७) आणि पनवेलमधील राम फुलचंद कानोजिया (४३) यांना अटक करण्यात आली आहे. या टोळीचा सप्रे प्रमुख असून तो अकोटमधील पसार आरोपी शुभम लोणकरच्या संपर्कात होता. नितीनवर हत्या, हत्येचा प्रयत्न, शस्त्रबंदी कायद्यान्वये गुन्हे नोंद आहेत. नितीन हा रामच्या मदतीने त्याची टोळी चालवत होता. शस्त्रासंबंधी तो शुभम लोणकरच्या संपर्कात आला. शुभम पाठोपाठ तो याप्रकरणातील आरोपी मोहम्मद झिशान अख्तरच्या संपर्कात होता. त्यांच्या सांगण्यावरून तो या कटात सहभागी होता. त्याने साथीदारांच्या मदतीने तीन पिस्तुली मारेकऱ्यांना दिल्या. त्या गुन्हे शाखेने जप्त केल्या आहेत.

धर्मराज कश्यप आणि शिवकुमार गौतम उर्फ शिवा हे दोघे नितीन सप्रे व राम कनोजियासोबत ऑगस्ट महिन्यात एक दिवस कर्जतमधील एका झोपडीत वास्तव्याला होते. या टोळीने त्यांना पैसेही पुरवले. पुढे सप्टेंबर महिन्यात आरोपींनी त्यांना शस्त्र पुरवले. त्यांच्या संपर्कात आणखी कोण आहे ? याचा तपास सुरू आहे. उत्तर भारतातून त्यांना शस्त्र मिळाल्याची पान २ वर...

## पतसंस्था घोटाळ्यात भाजप मंत्र्यावर आरोप

**चर्चेतले:**पोलीस उपायुक्ताच्या याचिकेनंतर खळबळ

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

जळगाव स्थित भाईचंद हिराचंद रायसोनी बहुराज्यीय सहकारी पतसंस्थेच्या घोटाळ्याच्या चौकशीत त्रुटी ठेवल्याप्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या पोलीस अधीक्षक भाग्यश्री नवटके यांनी आता याप्रकरणात राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांच्यावर थेट आरोप केला आहे. घोटाळ्याच्या आरोपपत्रासह दाखल असलेल्या अंतरिम न्यायवैद्याक लेखा परीक्षण अहवालात महाजन हे लाभार्थी असल्याचे उघड झाले होते,



असा दावा नवटके यांनी फौजदारी रिट याचिकेत केला आहे. तसेच अन्य एका घोटाळ्याच्या तपासात राज्याच्या पोलीस महासंचालक डॉ. रश्मी शुक्ला यांच्याशी संबंधित व्यक्तींवर पान २ वर...

### महाजन यांच्याकडून खंडन

मंत्री गिरीश महाजन यांनी हे आरोप फेटाळले असून राजकीय षडयंत्रातून हे सर्व सुरू असल्याचे म्हटले आहे. ‘ही पतसंस्था बहुराज्यीय असल्यामुळे आवश्यक असलेली केंद्र सरकारच्या निबंधक कार्यालयाची परवानगी तसेच आर्थिक गुन्ह्यासाठी पोलीस महासंचालकांचीही मान्यता घेण्यात आलेली नव्हती. आपल्याला अडकविण्याचे हे राजकीय षडयंत्र आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी राजकीय दबावाऐवजी तपास करून निर्णय घेणे अपेक्षित असते. मी व माझ्या पत्नीने एक रुपयाही कर्ज घेतलेले नाही वा पतसंस्थेची कुठलीही मालमत्ता घेतलेली नाही. आता तपास सीबीआयकडे आहे. याशिवाय न्यायालयातही सत्य बाहेर येईलच, असे त्यांनी सांगितले.

## तरुणीला कॅमेऱ्यासमोर विवस्त्र होण्यास भाग पाडलं

**खळबळ:**डिजिटल अरेस्ट करुन,५ लाख रुपयेही उकळले



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

अंमलीपदार्थविरोधी कायद्याचा धाक दाखवत एका अज्ञात व्यक्तीने २७ वर्षीय तरुणीला ५ लाख रुपयांनी गंडा घातल्याचे धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. इतकच नाही, ‘डिजिटल अरेस्ट’ केल्याचे म्हणत त्यांनी तिला कॅमेरासमोर विवस्त्र होण्यास भाग पाडल्याचंही पुढे आलं आहे. १३ ऑक्टोबर रोजी अहमदाबादमध्ये ही घटना घडली. तरुणीच्या तक्रारीनंतर पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे.टाईम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, १३ ऑक्टोबर रोजी पीडित तरुणीला एका अनोळखी क्रमांकाहून फोन आला होता. यावेळी तिच्या नावाने ड्रग्सचे एक पार्सल थायलंडला पाठण्यात आल्याचं तिला सांगण्यात आलं. तसेच याप्रकरणी त्वरीत सायबर पोलिसांत तक्रार दाखल करण्याची सुचनाही संबंधित व्यक्तीकडून करण्यात आली. त्यानंतर काही मिनिटांनी तिला पुन्हा एक कॉल आला. यावेळी तिला दिल्ली पोलिसांच्या नार्कोटिक्स विभागातून बोलत असल्याचे सांगण्यात आलं. तसेच चौकशीसाठी व्हॉट्सअॅपवर व्हिडीओ कॉल जॉईन करा, असे सांगण्यात आलं.टाईम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, १३ ऑक्टोबर रोजी पीडित तरुणीला एका अनोळखी क्रमांकाहून पान २ वर...

### अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल

दरम्यान, आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तरुणीने आधी याची माहिती शेजारच्याला दिली. त्यांनी आरोपीच्या नंबर फोन लावण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा नंबर अस्तित्वात नसल्याचे सांगण्यात आलं. अखेर तरुणीने पोलीस ठाण्यात पोहोचत तक्रार दाखल केली. तरुणीच्या तक्रारीनंतर आता पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला असून आरोपींचा शोध सुरु असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

**जितेंद्र आव्हाडांचा दावा** | राज्यात चर्चेला उधाण

## सरकारने क्रिकेटपटूंची बक्षीसं दिली नाहीत!



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

जून महिन्यात टी-२० विश्वचषक स्पर्धा जिंकल्यानंतर महाराष्ट्र सरकारने भारतीय संघातील खेळाडूंचा सत्कार केला होता. तसेच त्यांना ११ कोटी रुपयांचे बक्षिस जाहीर केलं होतं. त्यावेळी सरकारच्या या निर्णयाची बरीच चर्चाही झाली होती. मात्र, आता भारतीय संघातील खेळाडूंना बक्षिसांची ही रक्कम अद्यापही मिळाली नसल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे. तसेच त्यांनी यावरून राज्य सरकारवर टीकाही केली आहे.जितेंद्र आव्हाड यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. भारतीय क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकल्यानंतर मुंबई आणि महाराष्ट्रात राहणाऱ्या विजेत्या संघातील खेळाडूंना कोट्यवधी रूपयांची बक्षिसे जाहीर केली. मात्र, ही रक्कम त्यांना अद्यापही मिळालेली नाही. काल आम्ही ज्या हॉटेलमध्ये मिटींगसाठी थांबलो होतो. त्या हॉटेलमध्ये विश्वचषक विजेत्या संघातील काही खेळाडू मला भेटले. बोलता-बोलता त्यांनी सांगितलं की आम्हाला जी बक्षिसे जाहीर करण्यात आली होती, ती अद्याप मिळालेली नाही. ही बाब खटकणारी आहे, असं जितेंद्र आव्हाड म्हणाले.

### अशाने सरकारची प्रतिमा मलिन होतेय

पुढे बोलताना त्यांनी यावरून राज्य सरकारवर टीकाही केली. माझी महाराष्ट्र सरकारला एवढीच विनंती आहे की, इथे - तिथे पैसे वाटतच आहात. तर ज्यांना कबूल केले आहेत. त्यांचे तरी पैसे वाटून टाका. जसे हे क्रिकेटपटू मला बोलले, तसे ते अनेकजणांना बोलले असतील. त्यातून सरकारची प्रतिमा मलिन होतेय, याचीच मला काळजी आहे, असं जितेंद्र आव्हाड म्हणाले.

## मुख्यमंत्री योजनादूत योजनेस स्थगिती

**निर्णय:**निवडणूक आयोगाची स्थगिती

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई : विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सरकारने घेतलेले विविध कल्याणकारी निर्णय आणि योजना जनतेपर्यंत पोचविण्यासाठी महायुती सरकारने आणलेल्या ‘मुख्यमंत्री योजनादूत’ योजनेला निवडणूक आयोगाने शुक्रवारी स्थगिती दिली. आचारसंहिता काळात योजनादूत उघडपणे सरकारचा प्रचार करणार असल्याने त्याला स्थगिती देण्यात आल्याची माहिती आयोगातील उच्चपदस्थ सूत्रांनी दिली.राज्य सरकारच्या विविध योजनांचा प्रचार, प्रसिद्धी करण्यासाठी तसेच या योजनांचा जास्तीत जास्त नागरिकांना लाभ मिळावा यासाठी त्यांना साह्य करण्यासाठी राज्यात ५० हजाह मुख्यमंत्री योजनादूत नेमण्याचा निर्णय सरकारने जुलैमध्ये घेतला होता. महिना १० हजार मानधनावर सहा महिन्यांसाठी योजनादूत नियुक्त करण्यात येणार होते. या योजनेच्या माध्यमातून तरुणांना रोजगारसंधी उपलब्ध करून देतानाच प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रात एक आणि शहरी भागात पाच हजार लोकसंख्येमागे एक योजनादूत नेमण्यात येणार होते. सरकारने पान २ वर...

### विरोधकांचा आक्षेप

महाविकास आघाडीने या योजनेच्या अंमलबजावणीला आक्षेप घेतला असून निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. त्याची दखल घेत आयोगाने या योजनेच्या अंमलबजावणीस स्थगिती दिली आहे. या योजनेच्या माध्यमातून मुख्यमंत्री योजनादूत सरकार म्हणजेच सत्ताधाऱ्यांचा उघड प्रचार करीत असल्याने तो सरळ आचारसंहिता भंग आहे. त्यामुळे या योजनेस स्थगिती देण्यात आली आहे. तरीही कोठे छुप्या पद्धतीने या योजनेची अंमलबजावणी होत असेल आणि कोणी तक्रार केली, तर कारवाई केली जाईल असा इशारा आयोगातील सूत्रांनी दिला.

# न्यायदेवता न्यायप्रियता!

न्यायदेवतेच्या डोळ्यांवरील पट्टी काढल्याचा आनंदीआनंद भारतवर्षात पसरला आहे. आता या न्यायदेवतेला सारे काही दिसू लागेल, अशी आशा व्यक्त केली जाते आहे. यास निमित्त आहे ते सर्वोच्च न्यायालयातील 'न्यायाधीश ग्रंथालया'च्या एका कोनाड्यात न्यायदेवतेची मूर्ती म्हणून आता एक पांढरीशुभ्र शिल्पकृती ठेवली गेल्याचे. ती कोणी ठेवली, कोणी घडवली याबद्दल काहीही अधिकृतपणे सांगितले जात नसले तरी ही मूर्ती आताच चर्चेत आली आहे, एवढे खरे. तिच्या अंगावर साडी आहे– नेसणे राजा रविवर्मा यांच्या चित्रांतल्या देवींसारखे, चेहरा तसाच आणि डोईवरील महिरपी मुकुटही भारतीय शैलीचाच– असे रूप असलेल्या या मूर्तीच्या एका हातात तराजू असला तरी दुसऱ्या हातात राज्यघटना आहे– भारताचे संविधान. ही मूर्ती शत–प्रतिशत भारतीय न्यायदेवतेची आहे, हे आता निराळे सांगावेच लागणार नाही. ती इतकी पांढरीशुभ्र आहे की, तूर्तास घाईघाईने प्लास्टर ऑफ पॅरिसमध्ये घडवलेले ते प्रारूप असावे. पुढे कदाचित त्याआधारे धातूच्या मूर्ती घडवल्या जातील मग तशाच आणखीही मूर्ती घडतील, त्यातल्या काही मूर्ती बाजारात विक्रीसाठी उपलब्धसुद्धा असतील आणि पैसेवाले त्या विकतही घेतील हे होईल तेव्हा होईल. तूर्तास मीडियात आणि व्हॉट्सअॅप, फेसबुकादि समाजमाध्यमांत या भारतीय न्यायदेवतेच्या रूप–गुणांची चर्चा गेले तीनचार दिवस सुरू आहे आणि न्यायदेवतेला डोळस करण्याचा मास्टरस्ट्रोक ज्यांच्या कारकीर्दीत झाला, त्यांचेही कौतुक यानिमित्ताने होते आहे. ते ठीक. परंतु न्यायदेवतेची प्रतिमा अनादिकालापासून आंधळी होती की नव्हती, तिला भारतानेच डोळस केले काय, या मुद्द्यांची चर्चा कुणीही करत नसल्याने इथे ती स्वत:हून – किंवा न्यायालयांतील प्रचलित शब्दप्रयोग करायचा तर 'सुओमोटो' उपस्थित करणे अगत्याचे.त्याआधी 'सुओमोटो'सारख्या शब्दप्रयोगांबद्दल. ते मूळचे लॅटिन भाषेतले. 'हेबियस कॉर्पस', 'इंटर अलिया', 'इन कॅमेरा', 'अॅमिकस क्युरे' यासारखे अनेकानेक लॅटिन शब्द आजही भारतभरातल्या वरिष्ठ न्यायालयांत वापरले जातात. ही लॅटिन भाषा आज जगात कुठेही संभाषणाची भाषा नाही, पण इंग्रजीने लॅटिनमधले कायदेविषयक शब्द उचलले आणि आजही ते तसेच आहेत. त्यामुळे इंग्रजी वसाहतवाद जिथे जिथे फैलावला, तिथे तिथे ते पोहोचले यात नवल नाही. कायद्याखेरीज अन्य फक्त रोमन कॅथोलिक ख्रिस्ती धर्माच्या आदेशांसाठी लॅटिन आज वापरली जाते. इटलीच्या रोम शहराच्या आतच 'स्वतंत्र राष्ट्रा'चा दर्जा असलेले इवलेसे 'व्हॅटिकन सिटी' हे लॅटिनचा वापर आजही करणारे एकमेव राष्ट्र. कुणाला हे लॅटिनचऱ्हाट लांबल्यासारखे वाटेल, कुणाला ते विषयांतर वाटेल; पण तसे नाही. कारण, याच व्हॅटिकन सिटीमध्ये हौशी वा कलाप्रेमी भारतीय पर्यटकसुद्धा आवर्जून पाहायला जातात अशा 'सिस्टीन चॅपेल'च्या इमारतीत एका दालनाच्या भिंतीवर न्यायदेवतेचे – अर्थात रोमनांच्या 'जस्टिटिया'चे छान रंगीबेरंगी चित्र १५२० सालात रंगवले गेले, त्या चित्राचा ऊहापोह केल्याखेरीज न्यायदेवतेच्या प्रतीकाचा इतिहास अपुराच राहील. हा इतिहास सुरू होतो तो ग्रीकांच्या 'थेमिस' या देवतेपासून. ती, आता नामशेष झालेल्या पुरातन ग्रीक संस्कृतीतली न्यायाची देवता. तिच्या डोळ्यांवर पट्टी असायची. पण रोमनांच्या 'जस्टिटिया' न्यायदेवतेचे इसवीसन १५२० मधले हे चित्र आहे राफाएल नामक चित्रकाराने केलेले. लोकांना चटकन आठवणारे मायकेलँजेलो, लिओनार्दो दा विन्ची आदी सारे चित्रकार या राफाएलच्याच काळातले. राफाएलने चितारलेल्या 'जस्टिटिया'चे डोळे उघडे आहेत!

त्यानंतर ५०० वर्षांनी आपण 'न्यायदेवतेचे डोळे उघडले' अशा उत्साहात चर्चा करण्याचे कारण काय? याआधी बराच काळ, बऱ्याच जणांनी डोळ्यावर पट्टी असलेली 'थेमिस' न्यायदेवता पाहिली आहे हे खरे. पण ग्रीकांची थेमिस काय, किंवा रोमनांची जस्टिटिया काय, प्रतीकांच्या रूपामध्ये त्या–त्या स्थळकाळातल्या संकल्पनांनुरूप बदल होतच असतात. जगभरात या न्यायदेवतांच्या मूर्तींची वा प्रतिमांची निरनिराळी रूपे दिसतात. तेहरानमध्ये– आज खोमेनी व खोमेनींच्या राजवटीखाली असलेल्या इराणमध्येही न्यायदेवतेचे हेच पट्टीधारी शिल्परूप तेथील न्यायालयाच्या इमारतीवर १९४० च्या सुमारास प्रस्थापित झाले, ते समूहशिल्प आहे. म्हणजे तेहरानची ती न्यायदेवता एकटी नाही. तिच्या सर्वांत जवळ बालक– मग महिला– त्यानंतर कामकरी पुरुष आणि सर्वांत धनिक पुरुष अशी रचना दिसते. हातात तलवारीऐवजी कायद्याचे पुस्तक असलेली न्यायदेवता जर्मनीच्या सॅक्सनी प्रांतीय न्यायालयाच्या इमारतीवर २००८ पासून विराजमान आहे. बांगलादेशात, ढाका येथील सर्वोच्च न्यायालयाच्या इमारतीसमोर साडी नेसलेल्या न्यायदेवतेची मूर्ती २०१६ मध्ये पहिल्यांदा उभारण्यात आली! पण बांगलादेशातल्या धर्मांधांचा करंटेपणा असा की, ही मूर्ती आपल्या संस्कृतीच्या विरुद्ध आहे म्हणून इथून ती हटवा, यासाठी २०१७ मध्ये हिंसक निदर्शने झाली. अखेर ती मूर्ती गुपचूप जरा आतल्या बाजूला नेण्यात आली. शेख हसीनांना भारतात पळून यावे लागल्यानंतर बांगलादेशातली ही साडी ल्यालेली न्यायदेवताही नष्ट करण्यात आली म्हणतात.आपला समाज प्रतीकांतच रमणारा आहे आणि प्रतीकांमुळे वास्तव बदलेल असे आज एकविसाव्या शतकाचा चतकोर सरत असतानाही त्यास वाटते आहे, हेही नव्या मूर्तीविषयीच्या चर्चेतून दिसले.

# तुम्ही या देशाची शासनकर्ती जमात बना



बौध्द समाजासोबत मोठ्या प्रमाणात येथील दोन्ही राजकीय पक्षाकडून आजपर्यंत समाजाचा वापरच झाला असून फक्त कोपऱ्याला गुळ लावून चाटत बसा अशी गत दोन्ही राजकीय पक्षामध्ये झाली आहे. त्यामुळे आता तरी समाजानं जाग होऊन आपली ताकद दोन्ही राजकीय पक्षांना दाखवून दिली पाहिजे. तर आपली किंमत राहते.नाहीतर आपण ना घर का ...ना घाट का...अशी अवस्था राजकीय क्षेत्रात समाजाची होऊन बसलेली दिसून येत आहे.आणि राजकीय आरक्षणाचा बौध्द समाजाला कितपत फायदा होत आहे. याचे आत्मपरीक्षण बौद्ध समाजानं करणे आजच्या घडीला तरी गरजेचे आहे....

समाज मे स्वाभिमान पैदा करो
क्योंकी स्वाभिमानी लोगों को
मिटाया तो जा सकता है
पर झूकाया नही जा सकता.!!

नांदेड जिल्ह्यातील देगलुर–बिलोली मतदार संघात १९५७ ते १९६२ या कालखंडात कै.लक्ष्मण डांगे (मातंग) आमदार म्हणुन निवडुन आले. तेव्हा पासुन ते आजपर्यंत या देगलुर–बिलोली मतदारसंघात एकही बौध्द उमेदवार निवडून आलेला नाही.आज देगलुर–बिलोली हा मतदार संघ २००९ पासुन अनुसूचित जातिसाठी राखीव आहे.२००९ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे कै.रावसाहेब अंतापूरकर (मातंग) यांचा विजय झाला.व शिवसेनेचे सुभाष साबणे यांचा पराभव झाला.२०१४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये भाजप व सेनेची युती झाली नाही.आणि भाजपच्या चिन्हावर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) गट यांच्याकडुन उद्योजक भिमराव क्षिरसागर (बौध्द) यांनी कमळ फुल या चिन्हावर निवडणूक लढवली होती.तेव्हा त्यांचा पराभव झाला.आणि शिवसेनेचे सुभाष साबणे यांचा विजय झाला. या देगलुर–बिलोली मतदारसंघात उच्चवर्गीय समजल्या जाणाऱ्या वर्गात अशी चर्चा झाली की, महारा पेक्षा मांग बरा आणि मांगा पेक्षा चांभार बरा अशी चर्चा करण्यात आली.आणि सुभाष साबणे यांना निवडुन आणण्यात आले. म्हणून देगलुर–बिलोली मतदारसंघात चर्मकार समाजाची चार–पाच हजार सुध्दा लोक संख्या नाही तरीही तेथे चर्मकार समाजाचा आमदार होतो.विषेश म्हणजे त्या आमदार सुभाष साबणे यांचे स्व:ताच मतदान सुध्दा या मतदारसंघात नाही.

तरीही त्यांचा निवडणुकीत विजय होतो.आणि या मतदारसंघात बौध्द समाजाचे ४० ते ४४ हजार मतदार असुन सुध्दा बौध्द उमेदवार निवडून येऊ शकत नाही. त्याचा पराभव होतो. हि चिंतन करण्याची बाब आहे.

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातुन एस.सी.,एस.टी,ओ.बी.सी.या बहुजन समाजाला आरक्षणाची तरतुद करून ठेवुन मुख्य प्रवाहात आण्याचे काम केले.परंतु आजही काही जनांना त्याची जान नाही.जेव्हा जेव्हा येथील जातिवादी मनुवादी विचाराचे लोक संविधान बदलण्याची भाषा करतात. आरक्षण हटवण्याची भाषा करतात.तेव्हा–तेव्हा बौध्द समाज पुढे येऊन मोर्चे,आंदोलन करून येथील मनुवाद्यांना सळो की पळो करून सोडण्याच काम बौध्द समाजांनी केले. मोर्चे,आंदोलनात लाठ्या,काठ्या व गंभीर गुन्हे सुध्दा बौध्द समाजाच्या नेत्यावर व कार्यकर्त्यांवर दाखल झाले. तरीही ते मागे हटले नाहीत. तर मग निवडणुकीत बौध्दांच्या उमेदवारांचा पराभव का होत आहे.याचे आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. ज्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या उपकारामुळे कै.रावसाहेब अंतापूरकर आमदार झाले.त्यांच्या देगलुर येथील कार्यालयात आजही डॉ.बाबासाहेबांचा फोटो नाही. २०१४ च्या निवडणुकीत त्यानंतर याच आरक्षित जागेवर सुभाष साबणे आमदार झाले.निवडुन आल्यावर आमदार साबणे जाहीर सभेत भाषण करताना म्हणाले की भास्करावं पाटील खतगावकर यांच्या उपकारानेचं मी आमदार झालो असे म्हणतात. सुभाष साबणे मुळचे मुखेडचे त्यांचे वडील सुध्दा आमदार होते. आणि आता बिलोली–देगलुर अनुसूचित जाती साठी आरक्षित असल्याने मुखेड येथून येऊन देगलुर–बिलोली मतदारसंघात (ड.उ.) साठीराखीव जागेवर निवडुन येऊन एखाद्या व्यक्तीचे उपकार आहेत. असे ते समजतात तर मग डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपकाराची जान का नसावी. सुभाष साबणे यांनी आरक्षणाचा वापर न करता खुल्या प्रवर्गातील जागेवर उमेदवारी दाखल करून निवडुन यावे.मग तेव्हा कळेल की तुमच्यावर कोणाचे उपकार आहेत. ते या भरकटलेल्या आमदारांच्या बुध्दी ची किव येते. १९५७ ते १९६२ या कालखंडात लक्ष्मण डांगे (मातंग) आमदार होते. नंतर २००९ या वर्षी कै.रावसाहेब अंतापूरकर



सिध्दार्थ कांबळे
संपर्क:९७६६२७५३५८

(मातंग) आमदार झाले. व २०१४ ला सुभाष साबणे (चर्मकार) आमदार झाले. तेव्हा पासुन ते आजपर्यंत या बिलोली–देगलुर मतदारसंघात अनुसूचित जाती राखीव मतदारसंघ असुन सुध्दा येथे बौध्दांचा उमेदवार निवडुन येत नाही.नाही तर नाही याचे आम्हाला दुखःनाही. परंतु (ड.उ.) समाजाचे प्रतिनिधी म्हणुन विधानसभेत पाठवले आहे. तेव्हा त्यांना एस.सी.समाजासाठी विशेष योजना मतदारसंघात राबवणे हे त्यांच प्रथम कर्तव्य आहे. पण ते आज सर्वकाही विसरून गेले आहेत. आमदारांना निधी तर येतोच तो निधी सोडुन विषेश कोणत्या योजनेची त्यांच्याकडे संकल्पना आहे का ? नाही जर वाडप्या आपला असुनही पंगतीत जेवायला बसलेल्या जनतेच्या पदरात काही पडत नसेल तर आणि त्याच्यामुळे समाजाचा काही विकास होत नसेल तर अश्या वाडप्यांचा समाजाला काय उपयोग,अशीगत देगलुर–बिलोली मतदार संघातील (ड.उ) समाजाची झाली आहे.देगलुर–बिलोली विधानसभा मतदारसंघामध्ये बौध्द समाजातील ईच्छुकांच्या यादी मध्ये भारतीय जनता पार्टी कडुन उद्योजक भिमराव क्षीरसागर,हर्ष कुंडलवाडीकर ईच्छुक उमेदवार आहेत. तर काँग्रेस पक्षाकडुन सुरेशदादा गायकवाड,उत्तमकुमार कांबळे बी.एम.कांबळे,गंगाधर सोंडारे,धोंडीबा कांबळे,निवृत्ती कांबळे सांगवीकर,गोविंद हानवटे,गंगाधर सोनकांबळे आदीजण ईच्छुक आहेत.पण भारतीय जनता पार्टीने काँग्रेस पक्षातुन नुकतेच भारतीय जनता पार्टी मध्ये प्रवेश केलेले विद्येमान आमदार जितेश अंतापुरकर यांना भारतीय जनता पार्टी कडुन तिकिट जवळपास शंभर टक्के फिक्स झाले असल्याचे बोलले जात आहे. तर काँग्रेस पक्षाकडून भारतीय जनता पार्टी मधुन नुकतेच काँग्रेस पक्षात प्रवेश केलेले माजी आमदार अविनाश घाटे यांना काँग्रेस पक्षाची उमेदवारी जवळपास निश्चित झाली असल्यामुळे बाकीच्या ईच्छुकांच्या आमदारकीच्या स्वप्नांचा चुराडा होत आहे.गलूर–बिलोली विधानसभा मतदारसंघात बौध्दांचे ४० ते ४५ हजार लोकसंख्या या मतदारसंघात आहे. तर मग हा मतदारसंघ (ड.उ.) साठी राखीव असताना सुध्दा बौध्द समाज सत्तेपासुन वंचित का आहे.म्हणून आता बौध्द समाज संघटित होऊन मतदानाच्या रुपाने येथील दोन्हीही प्रस्तापित राजकीय पक्षांना देगलूर बिलोली विधानसभा निवडणूकीत आपली ताकद दाखवून दिली पाहिजे तरच आपले राजकीय अस्तित्व निर्माण होईल.अन्यथा आपली अवस्था ना घर का...ना घाट का...अशी होऊन जाईल याचे आतातरी बौध्द समाजाने आत्मपरिक्षण करणे गरजेचे आहे.

## पान एक वरून

**सिद्दीकी हत्याप्रकरणी पाच**

प्राथमिक माहिती समोर आली आहे.अटक आरोपींच्या चौकशीतून या टोळीचा सहभाग स्पष्ट होताच गुन्हे शाखेने तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे या पाच जणांना अटक केली. याप्रकरणी गुन्हे शाखा अधिक तपास करीत आहे. याप्रकरणी आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली आहे. गोळीबार करणाऱ्यांपैकी धर्मराज कश्यप, गुरमेल सिंह या दोघांना घटनास्थळावरून अटक करण्यात आली होती. तसेच त्यांना मदत करणाऱ्या प्रवीण लोणकरला गुन्हे शाखेने पुण्यातून अटक केली होती. याप्रकरणी गोळीबार करणारा शिव कुमार ऊर्फ शिवा गौतम याच्यासह आरोपींना मदत करणारा मोहम्मद झिशान अख्तर व कटात सहभागी शुभम लोणकर यांचा शोध सुरू असून त्यांना पकडण्यासाठी पोलिसांनी लुक आऊट सर्क्युलर जारी केले आहे.कश्यप आणि शिवा या टोळीसोबत कर्जतला थांबले होते. कर्जतरून पनवेल जवळ आहे. पनवेलमध्ये सलमान खानचे फार्महाऊस आहे. या टोळीचा सलमान खानच्या घरावरील गोळीबार प्रकरणात सहभाग आहे का ? याचाही तपास गुन्हे शाखा करीत आहे.

**पतसंस्था घोटाळ्यात भाजप**

कारवाई केल्यामुळे आपल्यावर गुन्हा दाखल झाल्याचे नवटके यांनी याचिकेत म्हटले आहे.भाग्यश्री नवटके या भारतीय पोलीस सेवेतील २०१५च्या तुकडीतील अधिकारी असून त्यांनी केलेल्या आरोपांमुळे विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत विरोधकांकडून हा मुद्दा तापवला जाण्याची शक्यता आहे. राज्याचे ग्रामविकास आणि पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी मात्र हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्याशी वारंवार संपर्क करण्याचा प्रयत्न करूनही त्यांची प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही. जळगाव येथे मुख्यालय असलेल्या भाईचंद हिराचंद रायसोनी बहुराज्यीय सहकारी पतसंस्थेत एक लाख ६९ हजार ठेवीदारांच्या सुमारे १२०० कोटी रुपयांचा अपहार झाल्याचे २००७मध्ये उघड झाले. याप्रकरणी पतसंस्थेचे संचालक आणि पदाधिकारी यांच्याविरोधात विशेष न्यायालयात खटले सुरू आहेत. मात्र, २०१५ मध्ये या पतसंस्थेत अवसायक (लिक्विडेटर) नेमण्यात आल्यानंतर घडलेल्या घडामोडींनी या प्रकरणाचे गांभीर्य वाढवले. केंद्र सरकारच्या उपनिबंधकांनी २०१५ साली जितेंद्र कंदारे यांना अवसायक नेमल्यानंतर त्यांनी कर्जाच्या बदल्यात ठेवी एकरूप करण्याची बेकायदा योजना राबवली. त्यात ठेवीदारांना फक्त ३० टक्के मोबदला आणि कर्जदार आरोपींना मात्र, वारेमाप आर्थिक फायदा करून दिल्याचे उघड झाले. कंदारे यांनी पतसंस्थेच्या मालमत्ताही मातीमोल दरात विकल्याचे निष्पन्न झाले.

**तरुणीला कॅमेऱ्यासमोर विवस्त्र**

फोन आला होता. यावेळी तिच्या नावाने ड्रग्सचे एक पार्सल थायलंडला पाठण्यात आल्याचं तिला सांगण्यात आलं. तसेच याप्रकरणी त्वरीत सायबर पोलिसांत तक्रार दाखल करण्याची सुचनाही संबंधित व्यक्तीकडून करण्यात आली. त्यानंतर काही मिनिटांनी तिला पुन्हा एक कॉल आला. यावेळी तिला दिल्ली पोलिसांच्या नार्कोटिक्स विभागातून बोलत असल्याचे सांगण्यात आलं. तसेच चौकशीसाठी व्हॉट्सअॅपवर व्हिडीओ कॉल जॉईन करा, असे सांगण्यात आलं.सुरुवातीला तरुणीने नकार दिला. मात्र, तिला डिजिटल अरेस्ट करण्यात आलं असून जॉईन न झाल्यास अटक करण्यात येईल, अशी धमकी देण्यात आली. त्यामुळे घाबरलेल्या तरुणीने लगेच व्हिडीओ कॉल जॉईन केला. यावेळी आरोपीने तिला जन्मखून तपासाची असल्याचे म्हणत विवस्त्र होण्यास सांगितले. तरुणीने त्यालाही नकार दिला. पण पुन्हा तिला अटक करण्याची धमकी देत विवस्त्र होण्यास भाग पाडले. त्यानंतर आरोपीने विवस्त्र होतानाचा व्हिडीओ रेकॉर्ड करत तो व्हिड़ीओ सार्वजनिक करण्याची धमकी दिली. तसेच तिच्याकडून जवळ ५ लाख उकळले.

**मुख्यमंत्री योजनादूत योजनेस**

स्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या सोयीसाठी ही योजना आणल्याची टीका त्यावेळी विरोधकांनी केली होती. प्रत्यक्षात मात्र महायुती सरकारची ही महत्वकांक्षी योजना पूरती फसल्याचे समोर आले आहे. या योजनेच्या माध्यमातून आतापर्यंत ५७४ ग्रामपंचायींमध्ये मुख्यमंत्री योजनादूत नियुक्त केले आहे.

**योजनादूतांमार्फत प्रचारप्रसिद्धीचे काम थांबविले**

निवडणूक आयोगाच्या स्थगिती आदेशानंतर योजनादूतांमार्फत प्रचार प्रसिद्धीचे काम करण्यात येणार नाही. सद्यास्थितीत योजनादूतांमार्फत प्रचार प्रसिद्धीचे कोणतेही काम नसल्याने त्यांना कोणत्याही प्रकारचा आर्थिक मोबदला दिला जाणार नाही. यासंदर्भात जिल्हास्तरीय अंमलबजावणी यंत्रणांनाही सूचना देण्यात आल्याचे माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाने स्पष्ट केले आहे.

## पान सहा वरून

**बीडची जागा महायुतीकडून**

कुंडलिक बांडे, पवन गुंदेकर, सौरभ गुंदेकर, ज्ञानेश्वर बांडे, जयराम गुंदेकर, व्यंकटेश गुंदेकर, हनुमंत बांडे, मच्छिंद्र बांडे, विश्वंभर नवसागर, विष्णू गुंदेकर आदींची उपस्थिती होती. तसेच, सकाळच्या सत्रात ग्रामीण भागात दौरा केल्यानंतर सायंकाळी बीड शहरातील प्रभाग क्रमांक १, २ भागातील कॉर्नर बैठका घेतल्या. ठिकठिकाणी स्थानिक नागरिकांसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर पहिल्याच दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

**निवडणूक काळात नियमांचे**

यांनी निर्गमित केलेल्या आदेशात म्हटले आहे.

**शस्त्र जमा करण्याची कार्यवाही :** शस्त्र परवानाधारकांची शस्त्रे जमा करणे आवश्यक असल्याने आचारसंहिता कालावधीत सदरील शस्त्रे जमा करावीत. तसेच आचारसंहितेचा कालावधी संपल्यानंतर संबंधितांना त्यांची शस्त्रे परत करण्याची कार्यवाही पोलिस विभागाने करावी. यामध्ये बँक, महत्त्वाची कार्यालये, संस्था, विद्युत केंद्र व इतर महत्त्वाची कार्यालये यांच्याकडील शस्त्र परवान्यावरील शस्त्र वगळून सदरील शस्त्रांबाबत कार्यवाही करावी, असेही आदेशात नमूद आहे.

**लेकीन माहोल बदलणे**

मुस्लिम समाजासाठी अनेक कामासाठी निधी उपलब्ध करून दिला याची साक्षीदार आपण आहोत मोमीनपुरा येथे आरोग्य सुविधा मिळावी यासाठी रुग्णालयासाठी जागा उपलब्ध करून दिली बागवान समाजाच्या सभागृहासाठी ५० लाखाचा निधी उपलब्ध करून दिला राजकारणात मुस्लिम समाजाला प्रतिनिधित्व मिळावे यासाठी आमदार नगरसेवक पदासाठी समाजातील तरुणांना संधी दिली सध्या अफवा पसरवून अण्णांच्या बाबतीत गैरसमज पसरवले जात आहेत त्यामुळे समाजाने दिशाभूल करणाऱ्यांपासून सावध राहावे आणि या निवडणुकीत अण्णांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे आव्हान त्यांनी केलेयावेळी व्यासपीठावरील उपस्थित फईम सर,काझी मकदूम,अॅड खाजा,जमील भाई, सुलतान बाबा,सुलेमान पठाण आदींनी आपले मनोगत व्यक्त केलेमाजीमंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की,मेळाव्याच्या ठिकाणी आगमन झाले आणि मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू झाला एवढ्या मोठ्या पावसातही हजारो कार्यकर्ते उपस्थित राहिले हा शुभ शकुन आहे मला प्रत्येक निवडणुकीत हा समाज साथ देतो मागच्यावेळी काहींनी गैरसमज पसरवले आणि थोडक्या मताने मला थांबावे लागले पण हे करून समाजाचा काय फायदा झाला याचा कोणी विचार केला नाही सध्या अनेक जण उठा वेळी झाले आहेत गुटका मटका दारू टक्केवारीने जे लोक पुढे येऊ लागले आहेत ते तुमचे काय भले करणार?असा प्रश्न उपस्थित करून बहुत फडफडा रहा है कबूतर लेकिन माहोल बदलने वाला है असा आता म्हणू लागले आहेत, दिल को देखो चेहरा ना देखो चेहरे ने लाखो को लूटा है हे लक्षात ठेवा मी हक्काने मत मागतो कारण मी जे केलं ते समाजासमोर आहे कुठला निधी आणला तर तो थेट आपल्यापर्यंत पोहोचवला आहे त्यामुळे आगामी काळात आपण खंबीरपणे साथ द्यावी असे आव्हान त्यांनी केले यावेळी बीड शहरातील नजर चाचू मुन्नाभाई कलंदर पठाण यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह जाहीर प्रवेश केला

**संदीप कोतकरांची जिल्हाबंदी**

मतदारसंघात काटे की टक्कर होणार आहे ते महायुतीतील कोणत्या पक्षाचा कडुन निवडणूक लढवतात ते पाहणे मोठ्या उत्सुकतेचे ठरणारआहे त्यांचे नगर शहरात अनेक वर्षांनंतर आगमन होणार असल्याने त्यांचा समर्थकांनी त्यांचा स्वागताची नगर शहरात जोरदार तयारी सुरू केली

**सोयगाव तालुक्यात विजांचा**

फचौधरी या किरकोळ जखमी झाल्या असून रविना चौधरी या गंभीर जखमी आहे त्या तिघांना खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले आहे या घटनेमुळे खळबळ उडाली होती अद्यापही महसूल विभागाने घटनेचा पंचनामा केलेला नव्हता उपचार करून तिघेही महिलांना रात्री उशिरा घरी आणले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याने खासगी वैद्यकीय सूत्रांनी सांगितले परतीच्या पावसाच्या दोन दिवसांच्या उघडीपी नंतर सोयगाव सह तालुक्यात पुन्हा पावसाने थैमान घातले त्यामुळे कपाशी सह मका,सोयाबीन,ज्वारी व बाजरी या पिकांची नुकसान झाले आहे मक्याच्या पिकांना कोंब फुटून पुन्हा मका उगवला आहे तर कपाशीच्या कैऱ्या सडून झाडावरच कुजलेल्या अवस्थेत आहे त्यामुळे सोयगाव तालुक्यात कपाशीच्या उत्पन्नात घट आली असल्याने परतीच्या पावसाने मोठे नुकसान झाले आहे दरम्यान शुक्रवारी सायंकाळी माळेगाव पिंपरी शिवारात ढगफुटी सदृश पाऊस झाला आहे त्यामुळे माळेगाव, पिंपरी शिवारात कपाशी भिजून खराब झाली आहे दरम्यान मुसळधार पावसाने वेचणी करून शेतीच्या बांधावर ठेवलेल्या कपाशी चे गाठोडे ही ओले झाले आहे त्यामुळे घरी घेऊन जाणारही कापूस शेतांत भिजला आहे

**महायुतीकडून बीडची जागा**

विष्णू गुंदेकर आदींची उपस्थिती होती. तसेच, सकाळच्या सत्रात ग्रामीण भागात दौरा केल्यानंतर सायंकाळी बीड शहरातील प्रभाग क्रमांक १, २ भागातील कॉर्नर बैठका घेतल्या. ठिकठिकाणी स्थानिक नागरिकांसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर पहिल्याच दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

**शिवसनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांची भेट :** बीड तालुक्यातील आंबेसावळी येथे रेडे, डोंगरे परिवाराच्या विवाह सोहळ्यास भेट दिली. तसेच, परमेश्वर गुंदेकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देत यांच्या प्रकृतीविषयी विचारपूस केली. राजेंद्र व महादेव गुंदेकर यांचे वडील स्व.दामोधर गुंदेकर यांचे काही दिवसापूर्वी निधन झाले. त्यामुळे गुंदेकर कुटुंबियांचे सांत्वन केले. ग्रामीण भागाचा दौरा पूर्ण झाल्यानंतर बीडमध्ये महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांची भेट घेतली. ते गेल्या काही दिवसांपासून आजारी असल्याने त्यांची भेट घेत प्रकृतीविषयी विचारपूस केली.

**दत्त मंदिराच्या दर्शनाने प्रचाराचा**

असे समजून तुम्ही कामाला लागा असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले. यावेळी विश्वंभर फड, गणेश कराड, बबन मुंडे, लिंबराज लहाने,विनोद लहान, प्रशांत दहिफळे, माने सर, धनंजय सोळंके यांसह आदी उपस्थित होते.

**गेवराईचे निवडणूक वातावरण**

तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड हे निवड झाल्यापासून पक्ष वाढीसाठी अहोरात्र प्रयत्न करत आहेत. जसजशी विधानसभा निवडणूक जवळ येऊ लागली आहे तसतशी गर्दी राष्ट्रवादी संपर्क कार्यालयामध्ये होऊ लागली आहे. तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड योग्य माणसाची योग्य पदावर निवड करत असून त्यामुळे पक्ष मजबूत होत असून याचा फायदा विधानसभा निवडणुकीमध्ये होईल. महिनाभरात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादीने (शरद पवार गट) कंबर कसली आहे. तालुका अध्यक्ष अण्णासाहेब राठोड हे भेटी गाठी च्या माध्यमातून पक्षसंघटना मजबूत करताना दिसत असून गेवराई विधानसभा मतदारसंघांमध्ये त्यांनी जातीने लक्ष घालण्यास सुरूवात केली आहे. या सर्वांचा कार्य अहवाल तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी मुंबईतील सिल्वर ओक येथे शरदचंद्रजी पवार यांच्या समोर मांडला होता. यावेळी बंजारा समाजातील संत महंत उपस्थित होते या सर्वांनी गेवराई विधानसभेची जागा अण्णासाहेब राठोड यांना देण्यात यावी अशी मागणी यावेळी केली होती या मागणीला प्रतिसाद देत राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्रजी पवार यांनी लवकरच याबाबत घोषणा करण्यात येईल असे सुतवाच यावेळी उपस्थित महाराज मंडळी समोर केले होते. याच अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी दिनांक १८ ऑक्टोबर रोजी खासदार सुप्रियाताई सुळे यांची मुंबई येथे भेट घेऊन गेवराई विधानसभा मतदारसंघाची जागा महाविकास आघाडी मधून शरद पवार गटाला सोडावी अशी विनंती केली त्याच बरोबर प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार अमोल कोल्हे यांना भेटून विविध विषयांवर चर्चा केली व यासह अनेक बाबीवर चर्चा केली.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122

Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# नागरिकांना आरोग्यसेवा पुरविणे जबाबदारी!

## निवेदन — ट्रॉमा केअर युनिट सुरू करा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पाटोदा ग्रामीण रूग्णालय आणि बीड तालुक्यातील नेकनुर स्त्री व कुटीर रूग्णालय येथे ट्रॉमा केअर सेंटरची अत्यावश्यकता असुन तातडीने सुरू करण्यात यावे. अहमदपूर ते अहमदनगर आणि पैठण ते पंढरपूर दोन राष्ट्रीय महामार्गावरील अतिवेगाने वाहन चालवणे त्याच बरोबर उखडलेले रस्ते आणि रखडलेल्या कामांमुळे वाढत्या अपघातांची संख्या पाहता तातडीने उपचार न मिळाल्याने अपघातग्रस्तांना जीव गमवावे लागत असुन तातडीने पाटोदा आणि नेकनुर याठिकाणी ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे , शेख युनुस,स्वप्निल गलधर, निळकंठ वडमारे, विजय लव्हाळे, शेख मुबीन यांनी डॉ.अशोक थोरात जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी डॉ.अशोक थोरात यांनी सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने प्रस्ताव पाठवण्याचे आश्वासन दिले.



पाटोदा तालुका हा दुष्काळी आणि ऊसतोड मजुरांचा तालुका असुन तीन तालुक्यांचे मध्यवर्ती ठिकाण आहे. अहमदपूर ते अहमदनगर आणि पैठण ते पंढरपूर असे दोन राष्ट्रीय महामार्ग तालुक्यातुन जातात.वेगाने वाहने चालविणे तसेच जागोजागी उखडलेले आणि रखडलेले रस्त्यांचे काम यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असुन तातडीने उपचार न मिळाल्याने अपघातग्रस्तांना आपले जीव गमवावे लागत आहेत.

पाटोदा ग्रामीण रुग्णालयात दररोज ३०० रुग्ण उपचारासाठी दाखल होतात.याठीकाणी सुसज्ज इमारत असुन शस्त्रक्रियेसह इतर सुविधा उपलब्ध आहेत.मात्र ट्रॉमा केअर युनिटची सुविधा उपलब्ध नसल्याने अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.आष्टी व शिरूर या दोन्ही तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाच्या ठिकाणी ट्रॉमा केअर युनिटची सुविधा उपलब्ध असून केवळ पाटोदा तालुक्यातील ग्रामस्थ यापासून वंचित आहेत.हा पाटोदा तालुक्यातील ग्रामस्थांवर अन्याय आहे.त्यामुळे पाटोदा ग्रामीण रुग्णालय येथे ट्रॉमा केअर निर्मिती करून सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.अशी मागणी करण्यात आली आहे.

### ट्रॉमा केअर सेंटरमध्ये उपलब्ध सुविधा

ट्रॉमा केअर सेंटर सुविधा उपलब्ध झाल्यानंतर त्याठिकाणी सिटीस्कॅन मशीन,एसीजी हाडाचे ऑपरेशन, २ आर्थिफिजिशियन, भुलतज्ञ,२ वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती झाल्याने तातडीने आणि दर्जेदार उपचार होण्यास मदत होणार आहे.

# राज्यस्तरीय शालेय स्पर्धेसाठी निवड




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

संभाजीनगर सिद्धार्थ जलतरण तलाव येथे आयोजित विभागीय स्पर्धा पार पडल्या दरम्यान ट्विंकलिंग स्टार स्कूल च्या अथर्व शेळके याने एक मीटर स्प्रिंग बोर्ड तसेच तीन मीटर स्प्रिंग बोर्ड या प्रकारामध्ये प्रथम क्रमांक पटकावत राज्यस्तरीय स्पर्धेत आपले नाव कोरले. पुढील राज्यस्तरीय जलतरण स्पर्धा अमरावती येथे होणार आहे. तसेच याच शाळेतील सिद्धी जायभाय या विद्यार्थिनींने १६ ऑक्टोबर २०२४ रोजी एन–३ स्केटिंग रिंग सिडको छत्रपती संभाजीनगर येते आयोजित करण्यात आलेल्या विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक चे स्थान पटकावत राज्यस्तरीय स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले.निवडी बदल सर्व स्तरातुन कौतुक केल जात आहे.या यशाबद्दल स्कूल चे चेअरमन गणेश मैड, स्कूल संचालिका शीतल मैड, स्कूल डायरेक्टर कोमाथ भास्करन, प्राचार्या जयश्री कदम, उप प्राचार्य दीपक झा उप प्राचार्य कृष्णाकुमार, परिवेशिका मेरी अलेंझांडर, स्वाती राठोड, क्रीडा शिक्षक अशोक चौरे, दिनेश ढाकणे आदीनी सर्व विजय संघातील खेळाडूंचे अभिनंदन करून कौतुक केले आणि पुढील होणाऱ्या स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.

# गोरगरिबांच्या आरोग्य सेवेचे आशीर्वाद

## उपक्रम:जयदत्त क्षीरसागर यांची संकल्पना

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकनेते माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून सुरू झालेले महाआरोग्य शिबिर गावा–गावातील गोरगरिबांच्या आरोग्याची सेवा निरंतर करत आहे. प्रामुख्याने या शिबिराचा फायदा वृद्धांना होताना दिसून येत आहे.

बुधवार दिनांक १६ ऑक्टोबर रोजी वांगी येथे मोफत सामुदायिक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास वांगी येथील गावकर्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जवळपास ११५ रुग्णांनी आपल्या आरोग्याची मोफत तपासणी करून होमिओपॅथीची औषधी घेतली.आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय सलग्नित महात्मा गांधी रुग्णालय व द्वारा फिरता दवाखाना मोफत सामुदायिक आरोग्य शिबिराचा उपक्रम गेली ९० दिवसांपासून नियमितपणे राबवले जात आहे. हे शिबिर काकू–नाना प्रतिष्ठानचे सचिव तथा सल्लागार डॉ.अरुण भस्मे, आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी राजा मचाले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल, उपप्राचार्य डॉ.गणेश पांगारकर, डॉ.अंजली पांगरकर यांचे मार्गदर्शनाखाली तसेच डॉ. अंजली क्षीरसागर, डॉ.अमृता आगवान यांच्या समन्वयाने यशस्वी राबवले.





लोणार: येथील पोलीस ठाण्यात मिस्किन चौधरी जमीनदार यांचा पोलीस निरीक्षक निमिश मेहेत्रे स यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मोहसीन खान, अफाक अली, दानिश मुलाजी, हिकमत खान, फैजान अली, सोहेल खान, वाजिद खान, अक्रम खान आदी.




वडवणी:तालुक्यातील पिंपरखेड येथील छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयात,डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करतांना, शिलाताई उजगरे, अग्नि खळगे, यांचा विशेष सत्कार ,श्री वाघमारे, डीगे आदी.

# फिनिक्स ग्रुप आयोजित दांडिया महोत्सव

## सांस्कृतिक: महिलांच्या कलागुणांना वाव

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथे दांडिया महोत्सव संपन्न झाला.फिनिक्स ग्रुपने सिरसाळ्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांसाठी व्यासपीठ निर्माण केल आहे.दरवर्षी दांडिया महोत्सव महिला व मुलींसाठी आनंदाची पर्वणी ठरत आहे. यावर्षी प्रशिक्षण देण्याचे काम मनीषा ठोके मॅडम व अक्षदा ढेकळे यांनी केले. दांडिया महोत्सवाच हे आठव वर्ष, यावर्षी या कार्यक्रमाचे प्रायोजकत्व श्री पंडितगुरू पार्डीकर महाविद्यालय सिरसाळा– प्राचार्य के. के.पाटील सर,लक्ष्मी डेंटल क्लिनिक सिरसाळा– डॉ. कृष्णा दत्तात्रय ढेकळे,श्री सेवा हॉस्पिटल जुने बस स्टँड सिरसाळा– डॉ. श्याम गंपू पवार सर, मैत्री जनरल स्टोअर अँड गिफ्ट शॉपी– उमेश किरवले,सातबारा लेडीज अँड किड्स वेअर– अभिजीत निंबाळकर,आणी कालिंका जनरल स्टोअर्स अँड गिफ्ट शॉपी– श्याम वानरे यानी स्वीकारले. दोन दिवसाच्या कार्यक्रमात आनंदी आंबेपॉड मॅडम व दिव्या स्वामी मॅडम यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. बक्षिसाच्या मानकरी ठरल्या,भावना खामगावकर,आश्विन नागरगोजे



अंजली पांडे,श्वेता बोडके,धनश्री जिंतूरकर,,गायत्री गायकवाड,भावणा किरवले. गायत्री हा कार्यक्रम घेण्यासाठी न्यू हायस्कूल सिरसाळाचे मुख्याध्यापक घोळवे सर यांनी शाळेत कार्यक्रम घेण्यासाठी परवानगी देवून सहकार्य केले. तसेच आम्हाला निर्भय वातावरण मिळण्यासाठी सिरसाळा पोलीस स्टेशनचे ए.पी.आय .दहिफळे सर व सहकाऱ्यांचे सहकार्य लाभले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी फिनिक्स ग्रुपच्या सदस्य डॉ.रश्मी नावंदर,डॉ.ऊषा पवार,डॉ. सुषमा ललवाणी,डॉ. स्वाती सोनवणे, डॉ.प्रणिता तौर,सौ.वंदना देशमुख,प्रा.अनिता दहिवाळ आणी प्रा.डॉ.ऊषा माने. यांनी प्रयत्न केले

# अत्याचार प्रकरणी जामीन मंजुर

## अ‍ॅड. तेजेश नेहरकर : अटीशर्तीवर जमीन मंजूर

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

घटनेची हकीकत अशी की, दोघांनी मिळून पीडितेला संगणमताने पळवुन नेऊन अत्याचार केला तसेच कोंडून ठेवून बलात्कार केल्या प्रकरणी पिंपळनेर पोलीस स्टेशन येथे गु.रं.न. २३९/२०२४ अन्वये कलम १४० (३), १२४ (४), ६४ (२) (च्) ३, (ड) ११५ ३५१ (२) भारतीय न्याय संहिता २०२३ नुसार विविध कलमान्वयें फिर्यादी पिडीतेच्या जबाबावरून दि. ११/०९/२०२४ रोजी दोन्ही आरोपी नामे आकाश वाघमारे, बजरंग वाघमारे, रा. हिवरापहाडी ता. जिल्हा बीड यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला व दोन्ही आरोपींना तात्काळ पुणे येथुन अटक करण्यात आली होती. तसेच सदरच्या गुन्हा करताना पिडीतेला पळवून नेण्यासाठी वापरण्यात आलेली गाडी सुध्दा पिंपळनेर पोलीसांनी जप्त केली आहे. आरोपीचा जामीन अर्ज ड. तेजेश सुभाष नेहरकर यांच्या वतीने जिल्हा न्यायालयात दाखल करण्यात आला होता. आरोपीच्या बाजूने करण्यात आलेला भारी भक्कम युक्तीवाद, व आरोपीच्या वतीने मांडलेली बचावाची बाजु न्यायालयाने विचारात घेऊन आरोपीला अटी व शर्तीवर जामीन मंजुर केला आहे. या प्रकरणाकडे सर्व पंचक्रोशीतील नागरीकांचे लक्ष वेधले होते. आरोपीच्या वतीने सुप्रसिध्द वकील ड. तेजेश सुभाष नेहरकर यांनी काम पाहीले.



## अध्यात्मिक — महंत नामदेव शास्त्री यांचे अभुतपुर्व स्वागत

# भगवानगड मंदीरासाठी ६५ लाख देणगी

पाटोदा/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे काकडहिरा गाव आणि भगवान गडाचे खुप जुणे ऋणानुबंध आहेत. या ऋणानुबंधातूनच ग्रामस्थांनी महंत नामेदवशास्त्री यांना गावात बोलावून भगवान गडावरील माऊली मंदीरासाठी ६५ लक्ष रूपयांची देणगी जाहीर केली. यावेळी शास्त्रीजी यांचे ग्रामस्थांच्या वतीने अभुतपुर्व असे स्वागत केले.

विसाव्या शतकातील थोर संत भगवान बाबा आणि पाटोदा तालुक्यातील मौजे काकडहीरा येथील ग्रामस्थ भाविकांचे खुप ऋणानुबंध होते. यामुळे आजही काकडहिरा हे भगवानगडाचे मानाचे गाव आहे. भगवानगडाच्या कीर्तनात चालीचा मान काकडहिरा गावाला आहे. कारण भगवान बाबांनी जेव्हा पंढरपूरची दिंडी सुरू केली तेव्हा दिंडीत सर्वाधिक भाविक काकडहिरा गावचे असायचे. यामुळे भगवान बाबांनी चालीचा मान काकडहिरा गावाला दिलेला आहे. गावातील परंपरेच्या अखंड हरिनाम सप्ताहात भगवान गडाचे महंत शास्त्री महाराज यांना ग्रामस्थाने बोलावून त्यांची भव्य दिव्य रथातून मिरवणूक काढली होती. त्यावेळी आठ जेसीबीच्या माध्यमातून महाराजांवर पुष्पवृष्टी करण्यात आली. २०० किलो वजनाचा हारा क्रेनच्या सहाय्याने शास्त्री महाराजांना घालण्यात आला. गावात त्यांच्या स्वागतासाठी पुण्यावरून ढोल पथक मागविण्यात आले. सध्या क्षेत्र भगवान गड येथे ऐतिहासिक आणि भव्य असे संत ज्ञानेश्वर माऊलींचे मंदिर बांधले जात आहे. या मंदिरासाठी मौजे काकडहिरा ग्रामस्थांनी ६५ लाख रुपये देणगी देण्याचा संकल्प गडाचे महंत शास्त्री बाबा यांच्या उपस्थितीत जाहीर केला.



### लहान– थोर अशी सर्वांची मदत

पाटोदा तालुक्यातील मौजे काकडहिरा गावामध्ये ऊसतोड कामगार, नोकरदार, शेतकरी, शेतमजूर वास्तव्यास आहेत. गावातील प्रत्येक वर्गातील लहान– थोरांनी आपापल्या कुवतीनुसार भगवानगडाच्या माऊली मंदिरासाठी मदत जाहीर केली. माऊलींच्या मंदीरासाठी माझाही एक दगड या भावनेतून सर्वांनी सढळ हाताने देणगी जाहीर करून ६५ लाख रुपये देण्याचे जाहीर केले.

# धूर फवारणीकडे नपचे दुर्लक्ष

## समस्या: वाढत्या डासांमुळे आरोग्य धोक्यात

लोणार/पुण्यभूमी प्रतिनिधी

वातावरणातील बदलावामुळे शहरात काही दिवसांपासून डासांचा प्रादुर्भाव वाढल्याचे दिसून येत आहे. मोठ्या प्रमाणात डास घरात शिरत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. शासकीय, खासगी रुग्णालयांत डेंगीसदृश रुग्णांची संख्या वाढत असतानाही नपा प्रशासन धूर फवारणीकडे दुर्लक्ष करत आहे.सद्यस्थितीमध्ये पहाटे थंडी, दुपारी थोडा उन्हाचा कडाका, कधी ढगाळ वातावरण शहरात बघायला मिळत आहे. असे वातावरण डासांच्या उत्पत्तीस पोषक असल्याने शहरात डासांचे प्रमाण अचानक वाढले आहे.

काल झालेल्या पावसाने शहरातील नाले, डबके आदी ठिकाणी डास आढळून येत आहेत. सायंकाळी पाच ते सहा वाजेच्या दरम्यान नागरिकांना घराचे दरवाजे, खिडक्या बंद करून बसावे लागत आहे. अन्यथा घरात डासांच्या शिरकाव झालाच, अशी स्थिती आहे. त्यामुळे नपा प्रशासनाने आठवड्यातून एकदा तरी धूर फवारणी किंवा कीटकनाशक फवारणी करावी, अशी नागरिकांची मागणी आहे.



चौकट

### बॅटची विक्री वाढली

घरातील डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या औषधांनाही डास दाद देत नाहीत. त्यामुळे डासांना मारण्यासाठी इलेक्ट्रानिकची बैट वापरली जात आहे. या बॅटच्या विक्रीत वाढ झालीआहे. दरदिवशी माझ्या दुकानातून पाच ते सहा बॅटची विक्री होत असल्याचे विक्रेते वाजेद पठान यांनी सांगितले.

# कांदा पिकासाठी खत व्यवस्थापन

पिक संरक्षण

***कांदा पिकाची मुळे उथळ असल्याकारणे कांदा पिकात योग्य वेळी खत देणे खूप महत्वाचे आहे. पिकाचे अपेक्षित उत्पादन येण्यासाठी २५ ते ३० टन प्रती हेक्टरी चांगले कुजलेले शेणखत वापरावे. सेंद्रिय खतामुळे साठवण क्षमता वाढते त्यासाठी जास्तीत जास्त शेणखताचा किंवा हिरवळीच्या खतांचा वापर करणे आवश्यक आहे.***

नत्राची आवश्यकता पिकाच्या पूर्ण वाढीकरिता अनेक अवस्थेमध्ये असते. कांद्याचे रोप लावल्यानंतर दोन महिन्यापर्यंत नत्राची गरज जास्त असते. नत्र विभागून दोन ते तीन हफ्त्यात दिले असता त्याचा चांगला फायदा होतो, कांद्याची मुळे रुजल्यानंतर नत्राची गरज असते. कांदा पूर्ण पोसल्यानंतर मात्र नत्राची आवश्यकता नसते. अशा वेळी नत्र दिले तर डेंगळे येणे, जोड कांदे येणे, कांदा साठवणुकीत सडणे हे प्रकार होतात. तेव्हा शिफारस केलेले नत्र लागवडीनंतर खरीप हंगामात ४५ दिवसांच्या आत तर रब्बी-उन्हाळी हंगामात ६० दिवसांच्या आत दोन ते तीन हफ्त्यात विभागून देणे फायदेशीर ठरते.

पिकांच्या मूळांच्या वाढीकरिता स्फुरदाची आवश्यकता असते. स्फुरद जमिनीत चार इंच खोलीवर लागवडी अगोदर दिल्यास नवीन मुळे तयार होईपर्यंत स्फुरद उपलब्ध होते. स्फुरदाची मात्रा एकाच वेळी आणि ती पिकांच्या लागवडी अगोदर द्यावी. स्फुरद, नत्रासोबत दिल्यास स्फुरदाची उपलब्धता वाढते.

आपल्या जमिनीत पालाशचे प्रमाण भरपूर आहे. मात्र पिकांना उपलब्ध होणाऱ्या पालाशची मात्रा कमी असल्यामुळे, पेशींना काटकपणा येण्यासाठी, कांद्याचा टिकाऊपणा वाढविण्यासाठी, तसेच कांद्याला आकर्षक रंग येण्यासाठी, पालाशची आवश्यकता पिकांच्या वाढीच्या सर्व अवस्थेमध्ये असते. पिकाच्या लागवडी अगोदर स्फुरदाबरोबर पालाशची संपूर्ण मात्रा द्यावी.

कांद्याची साठवण क्षमता वाढविण्यासाठी त्याचप्रमाणे जमिनीत भुसभुशीत टिकवून ठेवण्यासाठी गंधकयुक्त खतांचा वापर करणे योग्य आहे. अमोनियम सल्फेट, सल्फेट ऑफ पोटॅश यासारख्या खतांचा वापर केल्यास त्यातून काही प्रमाणात गंधकाची मात्र मिळते. अन्यथा गंधकयुक्त खतांचा वापर केल्यास फायदा होतो.

कांदा पिकांचे भरघोस आणि चांगल्या प्रतीच्या उत्पादनासाठी संतुलित अन्नद्रव्याची आवश्यकता असते. खतांच्या मात्रा किती द्यावयाच्या हे जमिनीचा प्रकार, लागवडीचा हंगाम, खते देण्याची पद्धत यावर अवलंबून आहे. ज्या संयुक्त दाणेदार खतांमध्ये कमी नत्र आणि अधिक स्फुरद व पालाश असेल असे खत कांद्याला देणे सयुक्तिक ठरते. उरलेल्या नत्राची मात्र युरिया किंवा अमोनियम सल्फेट द्वारे दोन ते तीन हफ्त्यात लागवडीनंतर द्यावे. या व्यतिरिक्त पहिली खुरपणी झाल्यानंतर २० किलो गंधकयुक्त खत प्रती एकर दिल्यास कांद्याच्या साठवण क्षमतेमध्ये तसेच रंगामध्ये चांगले परिणाम दिसून येतात. कांदा पिकाला सूक्ष्मद्रव्याची गरज अतिशय कमी प्रमाणात लागते. सेंद्रिय खतांचा चांगला पुरवठा असल्यास सर्वसाधारण जमिनीत सुक्ष्मद्रव्याची कमतरता भासत नाही. हि सुक्ष्मद्रव्ये अधिक प्रमाणात दिली गेल्यास त्याचा पिकांवर अनिष्ट परिणाम दिसून येतो. त्यामुळे सूक्ष्मद्रव्ये जमिनीतून किंवा फवारणीद्वारे पिकाला द्यावे.

महाराष्ट्रात जेथे कॅनॉलच्या पाटाचे बारमाही क्षेत्र आहे व जेथे ऊस व गव्हाची उशिरा रब्बी हंगामात लागवड होऊन



आर्द्रतेचे प्रमाण उन्हाळी महिन्यात कायम राहून सुक्ष्म वातावरण निर्मिती होते अशा सौम्य हवामान असलेल्या क्षेत्रात नोव्हेंबर महिन्यात बियाणे टाकून जानेवारीच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत रोप लागवड केली जाते व जो कांदा मे महिन्यात तयार होतो अशा कांदा लागवडीला 'उन्हाळी कांदा' असे संबोधतात. या उशिराच्या रब्बी लागवडीत, एक तर पाण्याच्या पाळया जादा लागतात तसेच कांदा पोसणीच्या काळात (मार्च-एप्रिल) तपमान ३५ अंश सेल्सिअस पेक्षा अधिक झाल्याने उत्पादकतेवरही विपरीत परिणाम होतो.

त्याचप्रमाणे कांदा काढणीच्या वेळेस जर वळवाचा पाऊस आला तर साठवणूक क्षमतेवर अनिष्ट परिणाम होऊन कंद लवकर सडतो. तसेच या काळात बाजारपेठेत जास्त कांदा आवक झाल्यामुळे बाजारभावाला मंदी असते. या सर्व विविध कारणांमुळे उन्हाळी कांदा लागवड टाळून, एक-दीड महिना कांदा लवकर केल्यास उन्हाळी कांद्याचे रब्बी कांद्यात रूपांतर होऊन राज्याची कांदा उत्पादकता व साठवणूकक्षमता निश्चितपणे वाढू शकते. महाराष्ट्रातील बरीच कांदा लागवड रब्बी ऐवजी उन्हाळयात होते या वास्तविकतेचा बारकाईने विचार करून शेतकरी बंधुनी आपली मानसिकता बदलून कांद्याचे अर्थकारण सुधारण्यास मदत होईल.

कांदा पिकास तांबे, लोह, जस्त, मॅगनीज व बोरॉन या सुक्ष्म अन्नद्रव्याची गरज भासते. तांबे या सूक्ष्म अन्द्रवयाच्या कमतरतेमुळे रोपांची वाढ खुंटते व पातीचा रंग करडा, निळसर पडतो. जास्तीची उणीव झाल्यास पाने जड होऊन खालच्या अंगाने वाकणे हि लक्षणे दिसतात. सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरतेची ओळख व खात्री पटल्यानंतरच त्या त्या द्रव्याची सल्फेटच्या रुपात फवारणी करावी. त्यासाठी झिंक सल्फेट ०.१ टक्के, मॅगनीज सल्फेट ०.१ टक्के, फेरस सल्फेट ०.२५ टक्के, बोरिक एसिड ०.१५ टक्के या प्रमाणात फवारणी करावी. कांदा पिकास ६० दिवसांनी एकदा व ७५ दिवसांनी दुसऱ्यांदा पॉलीफिड व मल्टी के याची फवारणी केल्यास कांद्याची फुगवण होते आणि वजनात वाढ होते. पॉलीफिड ६ ग्रॅम पावडर १ लिटर पाणी तर मल्टी के ५ ते १० ग्रॅम पावडर १ लिटर पाणी या प्रमाणात फवारावे.

सध्या बहुतांश ठिकाणी कांद्याची लागवड चालू आहे. त्याकरिता प्रति हेक्टरी १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश द्यावे. १/३ नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश लागवडीच्या वेळी द्यावे. राहिलेले नत्र दोन हफ्त्यात लागवडीनंतर ३० व ४५-५० दिवसात विभागून द्यावे. कांदा पिकास नत्र शिफारस केलेल्या मात्रेपेक्षा जास्त व लागवडीच्या ६० दिवसानंतर दिल्यास कांद्याची पात जास्त वाढते मानी जाड होतात. कंद आकाराने लहान राहतो. जोड कांद्याचे प्रमाण जास्त निघते व साठवणक्षमता कमी होते.

**एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन:**

सेंद्रिय खतेः २५ ते ३० टन शेणखत/हेक्टर

जीवाणू खतेः अझोस्पिरीलम व स्फुरद विरघळवणारे (पीएसबी) जीवाणू

२५ ग्रॅम/किलो बियाण्यास पेरणीपूर्वी चोळावे.

**खते देण्याची योग्य वेळ:**

सेंद्रिय खतेः लागवडीपूर्वी १५ दिवस अगोदर द्यावे. रासायनिक खतेः ५०:५०:५० किलो नत्र:स्फुरद:पालाश/हेक्टर, अर्धे नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश पेरणीच्या वेळी द्यावे व उर्वरित ५० किलो मात्रा २ समान हफ्त्यात विभागून ३० व ४५ दिवसांनी द्यावे.
रब्बी हंगामाचा कांदा पुनर्रलागवडीपूर्वी १५ दिवस अगोदर गंधक हेक्टरी ४५ किलो या प्रमाणात द्यावे.

**डॉ. आदिनाथ ताकटे, प्रभारी अधिकारी,**
मध्यवर्ती रोपवाटिका (बियाणे विभाग)
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

# फुलांची काढणी आणि हाताळणी

**जगामध्ये अनेक फुलांची व्यापारी तत्वावर लागवड करण्यात येते. एकूण उत्पादीत होणा-या फुलांमध्ये फुलदाणीत (कट-फ्लावर्स) वापरण्यात येणा-या फुलांचा वाटा सुमारे ४५ टक्के आहे. फुलशेतीपासून चांगला फायदा मिळविण्यासाठी फुलांच्या उत्पादनाबरोबरच त्यांच्या योग्य वेळी काढणी आणि हाताळणीला सुद्धा विशेष महत्व दिले पाहिजे. फुलांच्या काढणी नंतरचे आयुष्य जास्त राहण्यासाठी फुलांची कापणी वाढीच्या योग्य वेळी करणे गरजेचे आहे म्हणूनच फुलांच्या निर्यातीमध्ये त्यांच्या काढणीला आणि हाताळणीला विशेष महत्व आहे. आपण आजच्या लेखामध्ये फुलांच्या निर्यातीमध्ये महत्वाचे स्थान असलेल्या गुलाब आणि निशिगंधाच्या काढणी व हाताळणी विषयी जाणून घेऊया गुलाब गुलाबाचे फूल हे निसर्गाची सुंदर निर्मिती असून दुनियेत त्याला अतिशय सुंदर फुल म्हणून मान्यता मिळाली आहे.**

**फुलांची काढणी**

गुलाब पुष्पांची काढणीचीवेळ आणि स्थिती गुलाबांच्या जाती परत्वे थोडी बदलते आणि अनुभवातून ती ओळखणे सोपे जाते गुलाबाच्या बहूतांशी तांबूस आणि तांबडया फुलांच्या जातीमध्ये फुलांच्या बाहेरील एक ते दोन पाकळया उघडायला सुरुवात झाल्यावर त्यांची काढणी करावी. हार तयार करण्यासाठी, अत्तर तयार
करण्यासाठी तसेच देवाला वाहण्यासाठी अथवा अन्य पदार्थ तयार करण्यासाठी पूर्ण उमललेल्या फुलांची काढणी करावी. अशी फुले मोठया उघडया टोपल्यात गोळा करतात. गुलाब पुष्पाची काढणी सकाळी भल्यापहाटे (सूर्योदयापूर्वी) किंवा सायंकाळी सूर्यास्ताच्या वेळेला करावी. त्यामुळे फुलांचे जास्त उन्हामुळे होणारे नुकसान टळते. उशिरा काढणी केल्याने फुलदाणीत वापरावयाच्या (कट फ्लावर्स) फुलांचे आयुष्य कमी होते तर अत्तर करण्यासाठी वापरावयाच्या फुलांतील सुगंधित द्रव्यांचे प्रमाण कमी होते.
फुलदाणीत वापरावयाच्या (कट फ्लावर्स) गुलाब पुष्पांची काढणी करताना फुलांच्या देठाची लांबी थोडी जास्तच ठेवावी आणि फुलांच्या देठाला चांगल्या निरोगी डोळयाच्या वरच्या बाजूस स्वच्छ आणि धारदार सिकेटरने छाट घ्यावा. सर्वसाधारणपने असे पाहिले जाते की गुलाबशेती करणारे लोक पाच पर्णिका
असलेली दोन पाने छाटाच्याखाली ठेवून गुलाब फुलांची काढणी करतात.
फुलांची काढणी केल्यावर (कट फ्लावर्स) त्वरित फुलांचे देठ फुलांच्या मानेपर्यंत पाण्यात बुडवून ठेवावेत. यासाठी साधी प्लॅस्टिकची बादली वापरली तरी चालते. खरबडून होणारे नुकसान टाळण्यासाठी गुलाबाची फुले वेगळी ठेवावीत, तोडणी संपेपर्यंत ती सावलीत ठेवावीत.

**फुलांची हाताळणी**

फुलांची तोडणी झाल्यानंतर गुलाब पुष्पांच्या देठ खालच्या बाजूला पुन्हा दोन सेंटिमिटर तोडून टाकावा. गुलाब पुष्पांचा त्वरित वापर करावयाचा नसल्यास ती बादलीमध्ये देठ बुडविलेल्या स्थितीत ४.४ ते ७.२ सेल्सिअस हवेचे तापमान असलेल्या शीत कोठारात ६ ते १२ तास ठेवावीत की ज्यामुळे फुलांचे (कट-
फ्लावर्स) आयुष्य वाढते. फुले तोडताना त्यांचा दर देठाच्या लांबीवर ठरतो. लांब दांडयाच्या फुलांना सर्वात जास्त दर मिळतो. फुलांची वर्गवारी लहान दांडा ७.५ ते ९ सें.मी., लांब मध्यम दांडा २५ ते २७.५ सें.मी., लांब व लांबदांडा ३७.५ ते ४५ सें.मी. लांब या प्रमाणे करतात. फुलांची हाताळणी करणे सोईचे व्हावे म्हणून देठाच्या बुंध्याकडील २० सें.मी भागातील पाने आणि काटे काढून टाकावे, ही गोष्ट फुलांची तोडणी करताना करावी.

**फुलाचे आवेष्ठन (पॅकेजिंग)**

१) गुलाबाच्या कट फ्लावर्स शीत कोठारात १ ते ५ सेल्सियस तापमानाला १० दिवस ठेवून ती बाहेर नेहमीच्या तापमानाला पुन्हा ५ दिवस टिकतात. असा लेनॅन्डर (१९६०) या शास्त्रज्ञाचा निष्कर्ष आहे.
२) हसेक १९८९ या शास्त्रज्ञाच्या मते गुलाब फुलांची प्रतवारी केल्यानंतर ती फ्रीजमध्ये परिरक्षकांच्या द्रावणामध्ये किमान ३ ते ४ तास दांडे बुडवून ठेवावीत. या परिरक्षकांच्या द्रावणात १ ते ३ टक्के साखर १०० ते २०० पी.पी. एम. ८- क्युनोलिन सायट्रेट तसेच ॲल्युमिनीयम सल्फेट सायटिक आम्ल किंवा
सिल्व्हर नायट्रेट यांचा वापर करावा.



३) माहर आणि हनान (१९८०) यांच्यानुसार परिरक्षक द्रावणात २७० किंवा ३६० पीपीएम कोबाल्ट नायट्रेट तसेच हायड्रॉक्सीक्युनेलिन सायट्रेट (एच. क्यू.सी) यांचा वापर केला गुलाब (कट-फ्लावर्स) फुलांचे आयुष्य ७ दिवसावरुन दिवसापर्यंत वाढते.
४) घेरघी आणि सहाध्यायी (१९८३) यांच्या नुसार गुलाबाच्या मर्सेलेस, झोरीना आणि मरिम्बा या जातीच्या फुलांचे आयुष्य परिरक्षकांच्या द्रावणात बुडवून ठेवल्यास वाढते. परिरक्षकांचे दावणात ४ टक्के साखर१ ०.०२ टक्के पोटॅशियम क्लोराईड यांचा वापर करावा
५) मेरी डेव्होर या गुलाब जातीच्या फुलांचे (कट-फ्लावर्स) दांडा परिरक्षकांच्या द्रावणात बुडवून ठेवल्यास त्यांचे आयुष्य दिवसावरुन ९ दिवसापर्यंत वाढते. या परिरक्षकांच्या द्रावणात ३ ते ५ टक्के साखर आणि ३०० पीपीएम ॲल्युमिनियम सल्फेट वापरावे.

**निशिगंध**

निशिगंध किंवा गुलछबू गुलछडी ही एक सुवासिक फुले देणारी वनस्पती आहे. या वनस्पतीचे शास्त्रीय नाव पॉलियांथेस ट्युबेरोसा आहे. झुडूप वर्गातील या वनस्पतीची उंची एक ते दीड मीटर एवढी असते. निशिगंधाला हिंदीत रजनीगंधा तर इंग्लिशमध्ये ट्यूबरोझ नाव आहे. निशिगंधाची फुले रात्री फुलतात. म्हणून त्या फुलांना निशिगंधा म्हणतात. फुलातील तेलाचा उपयोग अरोमा उपचारासाठी केला जातो. तसेच या तेलाचा उपयोग सुगंधी द्रव्य तयार करण्यासाठीही होतो. फुलाची गुणवत्ता, गंध यामुळेच निशिगंधाला व्यापारी पिकाचे महत्त्व प्राप्त झाले असून ते अनेक उपयोगी बाबीसाठी वाढवितात.

**फुलांची काढणी**

फुलदाणीत ठेवण्यासाठी निशिगंधाच्या फुलांचे तुरे दांडीसह काढावेत मात्र हार करण्यासाठी निशिगंधाच्या पुष्पकळया काढाव्यात. दिवसातील थंड वातावरणात सकाळी किंवा सायंकाळी निशिगंधाच्या फुलांची काढणी करावी. ४ ते ५ मजूर २ ते २.५ तासात ६० किलो फुलांची काढणी करतात. आधल्या दिवशी सांयकाळी फुलांची काढणी करुन ती दुस-या दिवशी सकाळी (म्हणजे सुमारे १२ तासानंतर) विक्री केल्यास फुलांच्या वजनात सुमारे ४० टक्के घट होते (रामेश्वर १९७६) फुलदाणीत ठेवण्यासाठी निशिगंधाच्या तु-यांची काढणी ज्यावेळेला तळाच्या दोन फुलांची जोडी पूर्णपणे उमलते अशा वेळी धारदार चाकूने करुन त्वरित फुलांचे दांडे पाण्यात बुडवून ठेवावेत. दांडयावर असलेली
लहान लहान पाने तशीच ठेवावीत त्यामुळे फुलांचे आयुष्य अधिक वाढते.
? फुलांची काढणीनंतर हाताळणी आणि पॅकेजिंग निशिगंधाच्या फुलांचे तुरे यांची प्रतवारी, त्यांची लांबी, फुलांच्या भागाची लांबी आणि प्रत्येक फुलांची
गुणवत्ता यावरुन करतात. नंतर त्यांची सुमारे १०० फुलांचे एक अशी गोल बंडल्स बांधतात. बंडलाच्या बुंध्याकडील भाग ओल्या वर्तमानपत्राच्या कागदात गुंडाळतात. उमललेली फुले आणि बंद पुष्पकळयांना होणारी इजा टाळण्यासाठी तु-यांचे पूर्ण बंडल नरम, सफेद टिश्यू पेपरमध्ये अथवा मेणकापडामध्ये गुंडाळावेत
हे तुरे नंतर कार्डबोर्ड बॉक्समध्ये पॅक करुन ते विमानाने त्वरित बाजारपेठेत पाठवावेत. निशिगंधाच्या उमललेल्या मोकळया पुष्पकळया १० ते १५ किलो फुले मावतील अशा बांबूच्या टोपल्यात भरुन जवळपासच्या घाउक बाजारपेठात पाठवितात, तिथे त्यांची वजनावर विक्री करतात.

**फुलांचे आयुष्य**

निशिगंधाच्या फुलांच्या आयुष्यविषयी संशोधनावर आधारित विशेष माहिती उपलब्ध नाही. फुलांची गुणवत्ता ही निशिगंधाच्या शेताला दिलेली खते (जाना आणि सहाध्यायी, १९७४) आणि जमिनीतील विविध क्षारांचे प्रमाण (सिंग आणि सहाध्यायी १९७४) यावर अवलंबून असते. पाठक (१९८१) यांच्या अभ्यासानुसारबेझीझिडॅझोल एसएडीएच परिरक्षकाच्या द्रावणात निशिगंधाच्या तु-यांचे दांडे बुडवून ठेवल्यास त्यांचे आयुष्य वाढते.

**'कु. भक्ती बाबुराव पर्येकर**, (आचार्य पदवी विद्यार्थीनी),
पुष्पशास्त्र व प्रांगणशास्त्र विभाग,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला
**डॉ. अनुराधा अरुण वाटाणे**, (सहायक प्राध्यापिका),

# गवती चहा

**सुगंधी तेल वनस्पती**

जमीन व हवामान - पाण्याचा निचरा होणारी रेताड जमीन या पिकाच्या लागवडीस योग्य आहे. लाल व वालुकामय जमिनीत हे पीक चांगले येते. कारण त्यामध्ये मुळांची वाढ उत्तम होते. कॅल्शियमयुक्त जमिनित, तसेच ज्या ठिकाणी पाणी साचून त्याचा निचरा होत नाही, तिथे हे पीक घेवू नये. गवती चहाला उबदार व उष्ण हवामान मानवते. भरपूर सूर्यप्रकाश व सम प्रमाणात पडणारा पाऊस गवती चहाच्या वाढीस पोषक असतो.



**पूर्व मशागत-** गवती चहाचे पीक एकदा लागवड केल्यानंतर ४-५ वर्षांपर्यंत जमिनीत रहाते. त्यासाठी लागवडी अगोदर चांगली मशागत करावी. जमिनीची उभी व आडवी नांगरट करून २-३ कुळवाच्या पाळया देऊन जमीन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणीच्या वेळी हेक्टरी १२-१५ टन शेणखत/ कंपोस्ट खत मिसळावे.

**अभिवृद्धी व लागवड** - नियमित सिंचनाची सोय असलेल्या जमिनीत वर्षभर केव्हाही लागवड करता येते. पण पावसाळयात केलेली लागवड जोमाने वाढते. सुगंधी तेलाच्या चांगल्या दर्जासाठी व उत्पादनासाठी गवती चहाची लागवड नवीन फुटव्यांपासून (ठोंब) करावी. फुटवे वेगवेगळे करून जास्तीची पाने व जुनी मुळे काढून टाकावीत. फुटव्यांची लागवड करण्यापूर्वी २५० ग्रॅम ॲझोटोबॅक्टर हे जीवाणू संवर्धक अर्धा लिटर पाण्यात मिसळून त्याचे मिश्रण तयार करावे. हे मिश्रण पाण्यात टाकून त्यात रोपांची मुळे बुडवून सरी वरंब्यावर ६० बाय ६० सें.मी. अंतरावर लागवड करावी. सुधारित जाती- प्रगती, प्रमाण, सी.के.पी. २५, कावेरी, कृष्णा, ओडी १९

सी.के.पी. - २५, कृष्णा या सुधारित वाणांमध्ये अधिक उत्पन्न देण्याची क्षमता आहे. म्हणून लागवड करताना सुधारित वाण वापरून लागवड करावी. गवती चहामध्ये तेलाचे प्रमाण ०.४ ते ०.६ टक्के असते. एकरी १० हजार ठोंब लागतात.

**पाणी व्यवस्थापन** - लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे. सुरुवातीला ३ ते ४ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. पावसाळयात पाण्याची गरज भासत नाही. मात्र उन्हाळयात पाण्याची हयगय करू नये. जमिनीत पाणी साठून राहिल्यास पिकाच्या वाढीवर अनिष्ट परिणाम होतो.

आंतर मशागत- रोपांची पूर्ण वाढ होईपर्यंत लागवड क्षेत्र खुरपणी करून तण विरहीत ठेवावे. म्हणजे लावलेल्या रोपांची योग्य वाढ होऊ शकेल. त्याचप्रमाणे प्रत्येक कापणीनंतर एक खुरपणी करावी. त्यामुळे वरची जमीन भुसभुशीत होते व मुळांना हवा मिळण्यास मदत होते. प्रत्येक कापणीनंतर मुळांना माती लावून घ्यावी. कारण मुळे जमिनीवर वाढण्याच्या गुणधर्मामुळे उघडी पडतात. उर्ध्वपातन प्रक्रियेनंतर तेल काढलेल्या गवती चहाची पाने दोन ओळींमध्ये पसरून आच्छादन केल्यास तणास प्रतिबंध होतोच, त्याचबरोबर जमिनीतील पाण्याचे बाष्पीभवन कमी होते. त्यामुळे पाण्याचीही बचत होते. कालांतराने या गवताचे नैसर्गिक खत तयार होऊन जमिनीत मिसळले जाते.

**खते :** लागवडीच्या वेळी प्रतिहेक्टर २० किलो नत्र, ४० किलो स्पुरद व ४० किलो पालाश द्यावा. लागवडीनंतर ५० ते ६० दिवसांनी ४० किलो नत्राचा दुसरा हप्ता द्यावा. प्रत्येक कापणीनंतर ५० किलो नत्र द्यावे.

काढणी - लागवडीनंतर पहिली कापणी ४ ते ५ महिन्यांनी येते. नंतरच्या सर्व कापण्या २ ते ३ महिन्यांनी शक्यतो फुलोऱ्याआधी कराव्यात. या पिकाची कापणी धारदार विळयाच्या साहाय्याने जमिनीपासून १५ ते २० सें.मी. अंतरावर करावी. कापणी केल्यानंतर आलेला पाला वजन करून घ्यावा व १ दिवस सावलीत वाळवून तेल काढण्यासाठी वापरावा. तेलांचे प्रमाण व प्रत कापणीची वेळ व पक्वता यावर अवलंबून असते. प्रत्येक कापणी नंतर नत्राचा हप्ता देऊन ताबडतोब पाणी द्यावे. त्यामुळे नंतरचे फुटवे लगेच फुटतात व पिकांची जोमदार वाढ होते. तसेच प्रत्येक कापणीनंतर लगेच तण, वाळलेली पाने इ. काढून जमीन तण विरहीत करावी. फुटव्याला साधारणतः पूर्ण वाढ झालेली ५ ते ६ पाने व फुटव्यांची उंची साधारणतः ३ ते ४ फूट असलेली अवस्था पिकाच्या कापणीस योग्य आहे.

**उत्पादन** - पहिल्या कापणीला गवताचे उत्पादन प्रतिहेक्टरी कमी मिळते. दुस ?या कापणीपासून ते वाढायला सुरुवात होते. तसेच पहिल्या कापणीतील गवतामधील तेलाचे प्रमाण व तेलातील सिट्रालचे प्रमाणसुद्धा कमी असते. दुसऱ्या कापणीपासून गवतातील तेलाचे प्रमाण व तेलातील सिट्रालचे प्रमाणसुद्धा वाढायला सुरुवात होते. पहिल्या वर्षी प्रतिहेक्टर २० ते २५ टन, दुसऱ्या वर्षी २५ ते ३० टन, तिसऱ्या व चवथ्या वर्षी ३० ते ३५ टन हिरवे गवत मिळते. नंतरच्या वर्षांत ते कमी कमी होत जाते. अशा वेळी पिकांचा फेरपालट करून पुन्हा लागवड करावी. गवती चहाच्या पानात ०.४ ते ०.६ टक्के तेल असते. तेलाचे प्रमाण हवामानावर अवलंबून असल्यामुळे पावसाळयात पानातील तेलाचे प्रमाण कमी होते. इतर वेळी वाढते. प्रत्येक वेळी निघणारे तेल बॅच प्रमाणे वजन करून त्याची नोंद ठेवावी.

**पीक संरक्षण**- 'करपा' या रोगात पानांच्या कडांना व टोकांवर लालसर काळे ठिपके दिसून येतात. गवत्या रोगात वनस्पतीची वाढ खुंटते व गवतासारखी दाट वाढ होते. 'काणी' नावाच्या रोगात पानांवर काजळीसारखी भुकटी तयार होते तर 'तंबोरा' या रोगाची लागण झाल्यावर पानांवर लालसर ठिपके आढळून येतात. नंतर हे ठिपके फुटून नारंगी पावडर बाहेर पडते.

**रासायनिक घटक -** गवती चहाच्या तेलात ७५ ते ८५ टक्के सिट्राल हा महत्त्वाचा घटक असतो.

**उपयोग-** या सुगंधी तेलामध्ये असणाऱ्या सिट्रालपासून तयार केल्या जाणाऱ्या आयोनन या सुगंधी द्रव्याला अत्तरे तयार करणाऱ्या उद्योगांकडून चांगली मागणी असते. तसेच जंतुनाशके तयार करण्यासाठी व डोकेदुखी, सांधेदुखी, यावरील औषधे, मालिश तेल तयार करण्यासाठी या तेलाचा उपयोग करतात.

**बाजारभाव -** गवती चहाचे तेल बाजारात ४५० ते ४७५ रु. प्रतिकिलो दराने विकले जाते.लेमन ग्रासची रोपे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, अहमदनगर येथे विक्रीसाठी उपलब्ध आहेत. एका रोपाची (ठोंब) किंमत १ रुपया आहे. लेमन ग्रासचे सर्वात जास्त उत्पादन दुसऱ्या, तिसऱ्या व चवथ्या वर्षी मिळते. नंतर ते कमी कमी होत जाते. या पिकाच्या पाल्याला गुरे खात नसल्यामुळे जनावरांपासून त्रास होण्याची किंवा चोरीला जाण्याची भीती नसते. परंतु तेल काढून उरलेल्या गवताचा उपयोग इंधनासाठी, क्षेत्र आच्छादनासाठी, दुभत्या जनावरांसाठी सकस खाद्य म्हणून होतो.

**संपर्क- विश्वास अजिंक्य**

# ढेमसे : वेलवर्गीय फळपीक

***ढेमसे ही उन्हाळ्यातील लोकप्रिय फळ भाजी आहे.या काळात बाजारात भाज्यांची आवक कमी असते तेव्हा निवडक भाज्या असतात त्यावेळी ग्राहकांच्या पसंतीची ही भाजी असते. याची लागवड फेब्रूवारी /मार्च महिन्यात करतात.याचे झाड वेलीसारखे पसरते किंवा आधाराने उंच वाढते.हे पिक ४/६ महिने चालते . कोणत्याही प्रकारच्या जमिनीत हे पिक येते.लागवड करताना दोन ओळीत एक ते दीड मीटर अंतर सोडावे तर दोन झाडात एक मीटर अंतर सोडावे . एका ठिकाणी दोन /चार बिया टोचाव्या उगवणी नंतर दोन सशक्त रोपे ठेवावी. एकरी ४/५ क्विंटल उत्पादन निघते.या भाजीत व्हिटामिन ए आणि के मोठ्या प्रमाणात असते, शिवाय आयर्न, कॅल्शियम, .फॉस्फरस असते. या झाडांच्या कोवळया पानांची ही भाजी करतात.***

**जमीन** : सर्व साधारणपणे हलकी ते मध्यम काळया जमिनीत ढेमसे या पिकाची लागवड केली जाते. तरी हलकी पोयटायुक्त जमीन या पिकास चांगली मानवते.

**हवामान :** या पिकाची बाराही महिने लागवड केली तरी चालते. अती उष्ण किंवा दमट हवामान या पिकास मानवत नाही. त्यासाठी कोरडे हवामान या पिकास चांगला प्रतिसाद देते.

**जाती : १) अर्का. २) लुधीयाना**

**बियाणे** : एकरी २ किलो बी पुरेसे होते. ह्या बियाचे कवच दोडका, घोसाळी, भोपळा या पिकाच्या बियांपेक्षा कडक असल्याने उगवण फार कमी होते. त्यासाठी १ लिटर पाणी गरम (कोमट) करून त्यात २५ मिली जर्मिनेटर टाकून १ किलो बी रात्रभर भिजत ठेवावे. नंतर सावलीत सुकवून लावावे.

**लागवड** : जमिनी हलकी असेल तर ३ बाय २ फूट अंतर ठेवावे. भारी जमिनीत ५ बाय २ फूट अंतर ठेवावे. भारी जमिनीत वेलांची वाढ भरपूर होते. साधारण जमिनीच्या प्रकारानुसार लागवडीतील अंतर ठेवावे. बी लावताना सुरुवातीला कल्पतरू सेंद्रिय खत १ - १ चमचा टाकून त्यात बी लावावे. त्याने जमीन भुसभुसीत होऊन जारवा व वेल वाढीस मदत होते.

**खते** : या पिकास रासायनिक खत देऊ नये. त्याने या पिकावर बुरशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. त्यासाठी शेणखत असेल तर ते वापरावे. अन्यथा कल्पतरू सेंद्रिय खत (एकरी ५० किली) दोन टप्प्यात लागवड करताना व खुरपणी केल्यानंतर द्यावे.

**पाणी** : उन्हाळयात ६ ते ७ दिवसाच्या अंतराने सकाळी ९ चे आत पाणी द्यावे. थंडीत ८ ते १० दिवसांच्या अंतराने सकाळी १० ते दुपारी ३ ह्या वेळेत पाणी द्यावे. पाणी देताना भीज पाणी (संपुर्ण पाणी देणे) न देता, टेक पाणी (हलकेसे पाणी देणे) द्यावे. माल लागल्यावर मात्र (तोडे चालू असताना) पाण्याच्या पाळया लवकर द्याव्यात.

**रोग** : ढेमसे (टिंडा) या पिकावर बुरशी रोगाचा प्रादुर्भाव जास्त होतो. कारण हे पीक वेलवर्गीय असल्याने वेलची वाढ जमिनीलगत पसरत असते. तसेच पाने केसाळ लवयुक्त, मऊ असल्याने थंडीतील दव, धुके पानावर पडून बुरशी येते. तर उन्हाळयात वातावरण अती उष्ण असल्याने पाणी दिल्यानंतर जमीन तापलेली असते. त्यामुळे झाडाला उष्णतेच चटका बसतो. त्यामुळे बुरशी, करपा या रोगांचा प्रादुर्भाव होतो.



या रोगांच्या प्रतिबंधासाठी व नियंत्रणसाठी डॉ.बावसकर टेक्नॉलॉजीची खालीलप्रमाणे फवारणी करावी.

**फवारणी :**

१) पहिली फवारणी : (लागवडीनंतर १५ ते २० दिवसांनी) : जर्मिनेटर २५० मिली.-थ्राईवर २५० मिली. -क्रॉपशाईनर २५० मिली. -प्रोटेक्टंट १०० ग्रॅम - प्रिझम १०० मिली. -हार्मोनी १०० मिली.- १०० लि.पाणी.

२) दुसरी फवारणी : (लागवडीनंतर २५ ते ३० दिवसांनी ) : थ्राईवर ५०० मिली. -क्रॉपशाईनर ५०० मिली.- राईपनर २५० मिली - प्रोटेक्टंट ५०० ग्रॅम - प्रिझम २५० मिली. - न्युट्राटोन २५० मिली - हार्मोनी २०० मिली. - १५० लि.पाणी.

३) तिसरी फवारणी : (लागवडीनंतर ४५ ते ५० दिवसांनी ) : थ्राईवर ७५० मिली.-क्रॉपशाईनर ७५० मिली. १ राईपनर ५०० मिली - प्रोटेक्टंट ५०० ग्रॅम - न्युट्राटोन ५०० मिली - हार्मोनी ३०० मिली. - २०० लि.पाणी.

ह्या तीन फवारण्या सुरूवातीपासून घेतल्यास रोगकिडीस आळा बसून वेलांची जोमदार वाढ होते. तसेच फळधारणा अधिक होउने उत्पादन वाढते.

**तोडणी** : साधारण ४० ते ४५ दिवसात फुलकळी लागते. ५५ ते ६० दिवसांनी तोडणी सुरू होते. फळ साधारण लहान अमेरिकन सफरचंदाच्या आकाराचे झाल्यावर तोडणी करावी. या अवस्थेत मालाला फिकट हिरवा, पोपटी कलर येतो. नखाने दाबले असता, टोकले असता फळ मऊ असते. १ किलोमध्ये १२ ते १६ फळे बसतात. माल कोवळा असल्यास याला मार्केट किलोस १० ते १५ रू. हून अधिक मिळते. फळे मोठी झाल्यावर वजन वाढते. परंतु फळे कडक बनतात. व चवीला सपक लागतात. त्यामुळे भाव कमी मिळतो. त्यासाठी वेळेवर तोडणी करणे फायद्याचे ठरते.

**मार्केट** : या पिकाकडे अनेक शेतकऱ्यांचे दुर्लक्ष असल्याने आवक कमी असते. त्यामुळे सतत वर्षभर मार्केट असते. जरी मालाची आवक वाढली. तरी ८ ते १० रू. किलोच्या खाली भाव येत नाही. इतर वेळी तर १० ते १५ रू. किलो ठोक भाव सहज मिळून जातो. ह्या फळभाजीस सिंधी, पंजाबी व बंगाली या लोकांमध्ये जास्त प्रमाणात मागणी असते.

**उत्पादन** : एकरी १५ ते २० टन निघते.

# सुपरफूड म्हणून ओळख असलेल्या मखान्याची शेती कशी करतात?





फुलदेव साहनी त्या गढूळ आणि चिखलाच्या पाण्यातून युरियाल फेरॉक्स नावाच्या वॉटर लिलीच्या बिया काढतात. त्याला मखाना, फॉक्स नट्स किंवा कमळाच्या बिया म्हणून सुद्धा ओळखलं जातं.

यात अनेक पौष्टिक मूल्यं असून, ब जीवनसत्व, प्रथिनं आणि फायबर मोठ्या प्रमाणात असतं. त्यामुळं याला 'सुपरफूड' म्हणूनही ओळखलं जातं. स्नॅक्स म्हणून मखान्याचा वापर केला जातोच; पण, दुधाच्या खीरमध्येही मखाने वापरले जातात.

उत्तर भारतातल्या बिहारमध्ये जिथं साहनी राहतात त्याच ठिकाणी जगातलं ९० टक्के मखान्याचं उत्पादन होतं.

वॉटर लिलीची पानं मोठी आणि गोलाकार असतात. तसेच ही पान तलावाच्या पाण्यावर तरंगताना दिसतात. पण, त्याच्या बिया तळाशी पाण्यामध्ये तयार होतात आणि त्यांना चिखलातून बाहेर काढणं हे काम अवघड असतं.

याच बिया काढताना काय त्रास होतो हे साहनी सविस्तर समजावून सांगतात. ते म्हणतात, 'आम्ही बिया काढण्यासाठी चिखलात उतरतो तेव्हा कान, नाक, डोळे आणि तोंडात चिखल जातो. त्यामुळं आमच्यापैकी अनेकांना त्वेचेचे आजार होतात. तसेच या वनस्पतीभोवती काटे असतात. त्यामुळे बिया काढताना हे काटे शरिरामध्ये रुततात.'

पण अलीकडच्या काळात शेतकऱ्यांनी लागवड प्रक्रियेत बदल केला असून वॉटर लिलीचे उत्पादन आता शेतात किंवा जिथं जास्त उथळ पाणी असतं तिथं घेतलं जातं. त्यामुळं एक फूट पाण्यातून या बिया काढणं सोपं झालं असून साहनी त्यामधून दिवसाला दुप्पट पैसा कमावू शकतात.

पण, मखाने काढणे अजूनही कठीण काम आहे. मला माझ्या परंपरागत व्यवसायाचा अभिमान आहे. मला तीन मुलं आहेत. मी खात्रीनं सांगतो की, माझा एक तरी मुलगा या मखान्याच्या शेतीचा वारसा पुढे चालू ठेवणार आहे, असंही ते म्हणाले.

मखाना लागवडीत बदल करण्यामागं एक प्रमुख नाव म्हणजे डॉ. मनोज कुमार. गेल्या दहा वर्षांपूर्वी त्यांच्या लक्षात आलं की, चिखल असलेल्या खोल पाण्यात मखान्याचं उत्पादन घेणं अवघड आहे. त्यानंतर नॅशनल रिसर्च सेंटर फॉर मखाना च्या वरिष्ठ शास्त्रज्ञांनी त्यांना उथळ पाण्यात लिलीची लागवड करण्यास मदत केली. त्यांनी गेल्या चार ते पाच वर्षांपासून या तंत्रज्ञानाची अंमलबजावणी केली.

या नव्या तंत्रज्ञानामुळे शेतातल्या उत्पादनाप्रमाणे मखान्याचं उत्पादन घेणं सोपं झालं आहे. यासाठी फक्त एक फूट पाण्याची गरज असते. त्यामुळं आता मजुरांना तासनतास खोल चिखलात काम करायची गरज राहत नाही, असं मनोज कुमार सांगतात.

त्यांच्या केंद्रानं अनेक वेगवेगळे प्रयोग केले. त्यात त्यांना अधिक उत्पन्न देणाऱ्या वाणाचा शोध लागला. यामुळे शेतकऱ्यांचं उत्पन्न तिप्पट झालं आहे.

तसंच, या मखान्याच्या शेतीमुळं शेतकऱ्यांना अवेळी येणारा पाऊस आणि पुराच्या संकटांना तोंड देता येतंय, असं डॉ. कुमार सांगतात.

सध्या NRCM अशा एका यंत्रावर काम करत आहे जे चिखलातून बिया काढू शकेल. नवनवीन तंत्रज्ञानामुळं जास्तीत जास्त शेतकरी या मखान्याच्या शेतीकडं आकर्षित होत आहेत. २०२२ मध्ये फॉक्स नट किंवा मखान्याची शेती ३५,२२४ हेक्टवर केली जात होती. पण, गेल्या १० वर्षांत हे क्षेत्र जवळपास तिपट्ट झालं आहे.

'आम्ही शेतकरी म्हणून नेहमी गहू, मसूर आणि मोहरीचं उत्पादन घेतलं. पण, प्रत्येकवेळी पुरामुळे पिकांचं नुकसान झालं. खूप पैसा वाया गेला.' असं धीरेंद्र कुमार सांगत होते.

धीरेंद्र कुमार यांनी पारंपरिक शेतीची वाट सोडून नुकतीच मखान्याची शेती करायला सुरुवात केली आहे. पीएचडीचा अभ्यास करताना त्यांची मखान्याच्या लागवडीवर काम करणाऱ्या शास्त्रज्ञांसोबत ओळख झाली. त्यामुळे धीरेंद्र यांनी माहिती घेऊन स्वतःच्या शेतात प्रयोग करायचं ठरवलं.

पहिल्याच वर्षी भरघोस उत्पादन झालं आणि त्यांना जवळपास ३५ ते ४० हजार रुपयांचा नफा झाला. आता मी लिलीचं लागवड क्षेत्र वाढवून सध्या १७ एकरमध्ये लिलीचं उत्पादन घेतात.

स्वप्नातही वाटलं नव्हतं की, मी कधी मखान्यांची शेती करेन. कारण, हे फार मेहनीचं काम असून ते शक्यतो मच्छीमारच करतात, असं धीरेंद्र सांगतात.

धीरेंद्र कुमार यांनी पीकामध्ये बदल केल्यानंतर महिलांनाही रोजगार मिळायला लागला आहे. त्यांनी बिया लागवडीसाठी जवळपास २०० स्थानिक महिलांना रोजगार दिला. शक्य तितक्या लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचं स्वप्न असल्याचं ते म्हणतात.

इथं फक्त शेतातच नवनवीन प्रयोग केले असं नाही. इथं मखाना, मधुबनी मखाना याचं तर उत्पादन घेतलं जातं. तसेच त्यावर प्रक्रिया करून जगभरात निर्यातही केले जातात.

एकदा मखान्यांची कापणी झाल्यानंतर त्याला धुवून, भाजून घेतात. तसेच त्याला हातोडीसारख्या साधनानं फोडून मग मखाना तयार केला जातो.

ही पद्धत घाण आणि धोकादायक आहे. तसेच त्याला अतिशय मेहनत लागत असून हे काम वेळखाऊ सुद्धा आहे. अनेकदा दुखापत होऊ शकते किंवा कुठं भाजू देखील शकतं, असं मधुबनी मखान्याचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शंभू प्रसाद सांगतात.

त्यांच्या कंपनीनं NRCM च्या मदतीनं वॉटर लिलीच्या बिया भाजून बिया फोडून मखाना तयार करण्यासाठी एक मशीन तयार केलं आहे. यामुळं मखान्याची गुणवत्ता आणि उत्पादन वाढल्याचं प्रसाद सागंतात.

त्यांच्या मधुबनी प्लांटमध्ये अशा तीन मशिन्सचा वापर केला जातो. पण, नवनवीन प्रयोग करून मखान्याची शेती आणि उत्पादन वाढलं असलं तरी किंमती कमी होतील असं वाटत नाही. जागतिक स्तरावर मखान्याची मागणी लक्षात घेता किंमती कमी करायच्या असतील तर मागणीच्या तुलनेत तितकं उत्पादनही व्हायला हवं, असंही ते म्हणतात.

मखाना लागवडीचे बिहारवर दूरगामी परिणाम होतील. सध्या ही सुरुवात आहे. पण, यामुळे भविष्यात राज्याचं चित्र बदलेल असं धीरेंद्र कुमार यांना वाटतं.

# प्रभावी गोचीड निर्मूलन काळाची गरज



अलीकडच्या काळात दूध धंद्यात पशूंना गोचीडचा प्रादुर्भाव हि बाब फार गंभीर झाली आहे. गोचिडांचा न्यायनात/निर्मूलन करण्यासाठी दूध व्यावसायिक फार उपाय योजना करत असूनही गोचिडांचे प्रमाण गायिंमध्ये वाढतच चालले आहे. गोचीड मारण्यासाठी म्हणून आजपर्यँत शेतकरी डेल्टामीथरिण, सायपेरमिथ्रीन, फ्लूमेथ्रीन सारखी कीटकनाशक वापरूनही गोचिडांचे निर्मूलन शक्य नाही. कारण यासाठी प्रथम गोचीड या बाह्य परजीवीचें जीवनचक्र समजून घेणे गरजेचे आहे.गायीच्या अंगावर असणारी गोचीड शरीरावर फक्त १९ दिवसच राहते. त्यानंतर ती जमिनीवर पडते व स्वतःला साधारण ४ इंच जमिनीमध्ये गाढून घेते व २२ दिवस शरीराबाहेर राहते, या काळात अंडी घालून व अंडी उबवून आपले प्रजनन चक्र पूर्ण करते. एक गोचीड साधारण ३५ ते ४० अंडी घालते.नंतर आपल्या पिल्लांसहित परत गायीच्या अंगावर चढते. म्हणजेच एकूणच १९ दिवस शरीरावर तसेच २२ दिवस जमिनीतच असे धरून ४१ दिवसांचे तिचे जीवनचक्र आहे.समजा जरी प्रभावी गोचीडनाशक वापरले तरी आपण फक्त एकच दिवसांच्या उपलब्ध गोचीड मारत असतो.शिवाय शरीरावर वापरलेल्या कीटकनाशक औषधांचा परिणाम फक्त त्याच दिवशी राहत असतो. म्हणजेच ४१ दिवसांपैकी फक्त एकच दिवसांचे गोचीड आपण मारतो आणि ४० दिवसांचे गोचीड शिल्लक राहतात. शरीरावर १०० गोचीड असतील तर शरीराबाहेर ३५०० ते ४००० गोचीड असतात.त्यामुळे गोचीड नाशक औषध प्रभावी होत नाही,हा शेतकऱ्यांचा समज होतो. आता शेतकऱ्यांनी गोठ्यातील गोचिडांचा नाश करण्याचे ठरविले मात्र तेही सोपे नाही. कारण जरी औषध फवारणी केली तरी गोचीड जमिनी खाली ४ इंच! त्यामुळे औषधांचा परिणाम नाही. गोठा जाळूनही जमीन ४ इंच खोलवर तापवत येत नाही. म्हणूनच निर्मूलन शक्य नाही. गोचिडांचे अनेक जाती आहे. परंतु एक विशेष बाब अशी कि गायीची गोचीड म्हशीला अथवा शेळीला लागत नाही. गोचीड पशूंच्या अश्याच अंगाला लागते कि जेणेकरून त्याठिकाणी रक्त वाहिनी जवळच असते आणि अशी जागा निवडते कि, जेणेकरून पशु अंग खाजवणार व घासणार नाही, गोचिडीस आठ पाय असतात त्याआधारे ती पशूंच्या केसाला व चामडीला घट्ट पकडते. नंतर तिची सोंड (काटा) शरीरात खुपसते व रक्तचे शोषण करते व १९ दिवस आपले शरीर पोसते व प्रजननक्षम बनते. शरीराबाहेर (जमिनीत) ती अन्नावाचून बावीस दिवस जगते. गोचिडांचा काटा फार विषारी असतो, कि ज्यामुळे जनावरांना गोचिडताप होण्याची शक्यता असते. या गोचीड तपासणीसाठी म्हणून एका गायीस उपचार करण्यास सुमारे १२०० रुपये खर्च येतो. तरीही जनावर वाचेल याची खात्री देता येत नाही. आजपर्यंत गोचीड मारण्यासाठी वापरण्यात येणारी कीटकनाशके पशूंच्या शरीरावर लावली जातात, परिणामी रक्त शोषल्याने जनावरांचे लिव्हर कमजोर होते. त्यामुळे लाल पेशी तयार होण्यास अडचण येते व रक्त पातळ बनत जाते. परिणामी शरीराची रोगप्रतिकार शक्ती कमी होते. याशिवाय रक्तत शोषलेल्या कीटकनाशकाचे काही प्रमाण दुधात येते.

ज्यावेळी पशूंच्या शरीरावर कीटकनाशक लावले जाते, त्यावेळी गोचिडांच्या बाह्य रंधातून ते तिच्या शरीरात जाते. अश्या परिस्तितीत गोचीड आणीबाणीच्या या काळात पशूचे शरीर सोडते. परंतु तिचा काटा काढता येत नाही व तो तसाच राहतो तो वरील सांगितल्याप्रमाणे जनावरांना भयानक आजार देतो.

गोचिडांचा नाश करायचा असेल तर आपणास उपाय आहे. हे सुचवण्या अगोदर आपण जुन्या पद्धतीचा व ऋषींनी सांगितलेल्या गोष्टी थोड्या विचार घेऊ. पूर्वीपासून एखाद्या व्यक्तीस चामडीला आजार झाल्यास उपाय म्हणून गरम पाण्याच्या कुंडात स्नान सुचविले आहेत. याला शास्त्रीय आधार सुद्धा आहे, खडकामध्ये गन्धक असेल व त्यावरून पाणि तर गन्धकामुळे पाणी गरम होते, व काही प्रमाणात सल्फर पाण्यात मिसळले जाते. ज्यावेळी एखादी व्यक्ती अश्या पाण्यात स्नान करते, त्यावेळी पाण्याबरोबर सल्फरहि शरीरात शोषले जाते व चामडीचे आजार बरे होतात. कारण गन्धक एक प्रभावी कीटकनाशक व बुरशीनाशक असल्याने फँगल तसेच खरूज सारखे त्वचारोग बरे होतात,विशेष म्हणजे गन्धक शरीराला उपयोगी आहे. तसेच ते जास्त झाल्याने हानिकारक नाही.आजही चामडीचा आजार बरा करण्यासाठी डॉक्टर मंडळी सल्फर साबण, इंजेक्शन, लोशन, क्रीमचा वापर करतात.

आता आपण पाहू कि सल्फर हे कश्याप्रकारे कीटकनाशक म्हणून काम करते. गोचिडांचा नाश करण्यासाठी सर्वसाधारण गंधक (सल्फर) वापरता येत नाही. त्यासाठी चिलेटेडयुक्त टोट्विट खाद्यपुरक (मिनरल मिश्रण) निवडावे लागते. कि मिनरल मिश्रणात १ किलोत कमीत कमी ९.२ ग्राम चिलेटेड सल्फर असावे, साधारण ३० ग्राम ते ५० ग्राम टोट्विट खनिज मिश्रण पशूच्या रोजच्या आहारात असेल तर साधारण २७५ ते ४६० मिली ग्राम सल्फरचे प्रमाण राहील. साहजिकच ते शरीरात शोषल्याने रक्तात अंश येईल. ज्यावेळी गोचीड रक्त प्राशन करेल त्याचवेळी गोचिडाची प्रजनन क्षमता कायमची बंद होते व स्वतःची चयापचय प्रक्रिया खराब होते. त्यामुळे ती बेचैन होऊन आपला काटा बाहेर काढते.थोडक्यात तिला विरक्ती व वैराग्य येते. म्हणजेच त्यानंतर ती रक्त पीत नाही. त्यामुळे ती उपाशी पोटी जास्तीत जास्त १० -१५ दिवस जगते व नंतर मरते. जी सल्फेरमिश्रित रक्त पिणार ती गोचीड हमखास मरणारच हे नक्की.


**- डॉ विकास बुद्रुक**

(नॅशनल डेयरी डेव्हलपमेंट बोर्ड, आनंद गुजरात मो. ९९२१३४५३४५


# सुगंधी तेल निर्मिती करीता पुदीना लागवड

हि वनस्पती बहुवर्शीय पसरणारे झुडूप असून ४५ ते ९० से.मी. उंच वाढते विषेशतः जगातील शितोष्ण व समशितोश्ण प्रदेषात पसरलेले आहे.पाने वाटोळी, निरनिराळया आकाराची व कडा दंतूर असतात.खोड गडद जांभळट रंगाचे असून त्यावर लव असते. अमेरीका, युरोप, पुर्व आषिया, चीन, तैवान, ब्राझील, भारत व जपान या देषामध्ये पुदीनाची व्यापारी तत्वावर लागवड केली जाते.भारतात मुख्यतः, नैनीताल, बिलासपूर, रामपूर, मुरादाबाद, बरेली, लखनऊ, लुधियाना व जालंधर व उत्तर पष्चिम भागात पुदीनाची (जपानी मिंट) मोठया प्रमाणावर लागवड केली जाते.

**रासायनिक घटक व उपयोगः** जपानी मिंटच्या तेलामध्ये सर्वात जास्त मेंथॉल असते.मेंथॉल चा उपयोग सर्दी, कफ, दंतरोग, मुखशुद्धी, सौंदर्य प्रसाधने, जंतूनाशक त्याचप्रमाणे जठर उत्तेजक गुणधर्म आढळतात.स्पीअरमिंट च्या तेलामध्ये कारव्हेन चे प्रमाण असते त्याचा उपयोग पचन व जठर उत्तेजक म्हणून करतात त्याला सौदर्यवर्धके, च्युईगगम व टुथपेस्टमध्ये करतात.

सुधारीत वाणः १) जपानी मिंटः एम.ए.एस., हायब्रीड-७७, ई.सी.-४१९११, सिवलिक. २) स्पीअरमिंटः एस.एस.एस-१, एम.एस.एस-५, पंजाब स्पीअरमिंट-१. ३) बेरगॉटमिंटः किरण इत्यादी वरील ४ प्रजातीपैकी महाराश्ट्रात पहाडी पुदीना आढळून येतो त्याचा उपयोग विषेशतः पुदीनाची चटणी किंवा पदार्थामध्ये करतात.

**हवामान व जमीनः** पुदीना या पिकास समषितोश्ण व षितोश्ण हवामान मानवते परंतू हवेतील आर्द्रता या पिकास अतीशय अनूकूल असते.हे पिक ५०० ते १५०० मि.मी. पर्जन्यमान असलेल्या प्रदेषात चांगले येते.या पीकास मध्यम ते भारी, पोयटयाची व निचछयाची जमीन चांगली मानवते.जमीनीचा सामु ६ ते ७.५ इतका असावा. या पिकास ४० फेरेनाईट ते १०५ फेरेनाईट तापमान मानवते.लागवडीच्या वेळेस पाऊस, स्वच्छ सुर्यप्रकाष पोशक ठरते.धुके, सावली व जोरदार वारा वाढीस प्रतीकुल ठरतो.



**पुर्व मशागतः** जमीनीची खोल नांगरणी करावी व नंतर २ ते ३ कुळवाच्या पाळया देवून जमीन पसरट करण्यापूर्वी गवत तसेच इतर खोड वेचून घ्यावेत २० ते २५ गाडया चांगले कुजलेले शेणखत मिसळावे.लागवड सपाट वाफ्यावर करावी परंतू ४५ से.मी.अंतर ठेवून सरी वरंब्यावर सुद्धा याची लागवड करता येते.

**लागवड पद्धतः** पुदीनाची लागवड जमीनीलगत पसरणाछया फांद्यापासून करतात अषा फांद्या डिसेंबर ते जानेवारी महिण्यात भरपूर फुटतात. ५ ते १० से.मी.लांबीच्या ३ ते ४ मि.मी.जाड फांद्यापासून ४५ ग् १० से.मी.अंतरावर सपाट वाफ्यामध्ये किंवा सरी वरंब्यावर २ ते ३ से.मी.खोल लागवड करावी. हिवाळयात जवळपास ३ ते ४ टण प्रती हेक्टरी फांद्या मिळतात.जास्त उत्पादनासाठी जानेवारीच्या शेवटी किंवा फेब्रुवारीच्या सूरूवातीला लागवड करणे सोयीचे ठरते.लागवडीच्यावेळी प्रतीहेक्टरी ४० किलो नत्र, ६० किलो स्फुरद व ८० किलो पालाश द्यावे.लागवड केल्यानंतर ताबडतोब पाणी द्यावे.पिकाच्या जोमदार वाढीसाठी जमीनीमध्ये ओलावा असणे गरजेचे आहे.साधारणपणे ८ ते १२ दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे.लागवडीनंतर ३० ते ४० दिवसांनी व ६० ते ७० दिवसांनी प्रतीहेक्टरी नत्राचा हफ्ता द्यावा.पिक सुरूवातीच्या काळात तणमुक्त ठेवावे त्यासाठी खुरपणी व कोळपणी करावी.प्रत्येक कापणीच्या आधी २ ते ३ वेळा खुरपणी करणे आवश्यक आहे.

**काढणी व उत्पादनः** डिसेबर, जानेवारी महिण्यात लागवड केलेल्या पिकाची पहिली कापणी एप्रिल, मे महिण्यात करावी.पिक फुलोऱ्यावर येण्यापूर्वी करावी.दुसरी कापणी जुलै व ऑगस्ट महिण्यामध्ये करावी.पिकाची चांगली काळजी घेतल्यास तीसरी कापणी ऑक्टोंबर मध्ये करता येते.पहिल्या कापणीपासून सर्वात जास्त उत्पादन मिळते.पुदीनाचे हिरव्या झाडाचे प्रतीहेक्टरी सरासरी २५ ते ३० टन उत्पादन मिळते.

तेलाचे प्रमाणः जपानी मिंट व बेरगॉट मिंट ०.४ ते ०.५ टक्के, पेपरमिंट व स्पीअरमिंट ०.२ ते ०.३ टक्के तेलाचे प्रमाण या प्रजातीमध्ये आढळून येते.


**प्रा.संजय बाबासाहेब बडे**

सहाय्यक प्राध्यापक (कृषि विद्या)

दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय


# शेतकरी आत्महत्येची ९ प्रकरणे मदतीसाठी पात्र

प्रतिनिधी

**अकोला :** जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत शेतकरी आत्महत्येचे १६ प्रकरण ठेवण्यात आले होते. यापैकी निकषात न बसणाऱ्या ५ प्रकरणांना अपात्र ठरविण्यात आले, तर २ प्रकरणांची फेरचौकशी होणार आहे. यावेळी ९ प्रकरणांच्या पात्रतेवर सोमवार, ७ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यामुळे मदतीसाठी पात्र शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासकीय मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सततची नापिकी, सावकार किंवा बँकेकडून घेतलेले कर्ज, उत्पादनापेक्षा लागवडीचा खर्च अधिक व इतर कारणांमुळे जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या करत आहेत. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाकडून एका लाखाची मदत देण्यात येते. संबंधित मदतीसाठी पात्र शेतकऱ्यांचे प्रकरण निश्चित करण्यासाठी शेतकरी आत्महत्याग्रस्त समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी पार पडली. यावेळी बैठकीत पात्र प्रकरणावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

## जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत शिक्कामोर्तब

**अशी आहेत पात्र प्रकरणे**



मुरलीधर इंगळे (६२) रा.भंडारज बु.ता.पातूर, उमेश ताले (४५) रा.चान्नी ता.पातूर, महादेव भाकरे (२५) रा.गायगांव ता.बाळापूर, पुरुषोत्तम वसू (५०) रा. नेव्हरी बु. ता.अकोट, राजू राठोड (४८) रा.राजनखेड ता. बार्शीटाकळी, उमाबाई राऊत (६५) रा.महान ता.बार्शीटाकळी, अंबादास मोहिते (६२) रा.महान ता.बार्शीटाकळी, सदानंद इंगळे (५०) रा.तुदगांव ता.तेल्हारा, स्वप्नील सुशिर (३२) बेलखेड ता.तेल्हारा

## दोन प्रकरणे फेरचौकशीत

जिल्हास्तरीय बैठकीत ठेवण्यात आलेल्या १६ प्रकारणांपैकी नऊ प्रकरण पात्र तर पाच प्रकरण अपात्र ठरवण्यात आले.याशिवाय दोन प्रकरणाची फेरचौकशी होणार आहे.पात्र प्रकरणात पातूर तालुक्याती दोन, बाळापूर एक, तेल्हारा दोन, अकोट एक, बार्शीटाकळी तालुक्यातील तीन असे एकूण नऊ प्रकरण पात्र ठरले. त्यासोबतच अकोट तालुक्यातील एक, बमूर्तिजापूर दोन, तेल्हारा दोन असे पाच प्रकरण अपात्र ठरवण्यात आले. तर बाळापूर तालुक्यातील दोन प्रकरणाची फेरचौकशी होणार आहे.

# कपाशींचं पीक सुकत असल्याने निर्माण झाले नवे संकट!

**हातरुण :** पांढरं सोनं म्हणून ओळखलं जाणारं वावरातलं कापसाचं उभं पीक डोळयादेखत सोकत असल्यानं अन्नदाता शेतकरी संकटात सापडला आहे. हिरवीगार कपाशीचं पीक अचानक सोकलेलं दिसत असल्यानं शेतकऱ्यांच्या समोर नवीन संकट उभे राहिले आहे. कृषी विभागाने बांधावर जाऊन पीक पाहणी व मार्गदर्शन करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

अकोला जिल्हा हा कापूस आणि सोयाबीन उत्पादक जिल्हा म्हणून ओळखला जातो. मांजरी, शिंगोली, दुधाळा, मंडाळा, बोरगाव वैराळे, सोनाळा, मालवाडा, हातला, लोणाग्रा, हातरुण परिसरात सोयाबीन आणि कपाशीचा पेरा यंदाच्या खरीप हंगामात वाढलेला आहे. वावर पेरल्यानंतर सतत पाऊस सुरू राहिल्याने पिकांचे अतोनात नुकसान झाले. शेतीची मशागत ठप्प पडली आणि शेतात पिकापेक्षा गवतच वाढल्याचे चित्र दिसून येत होते. हातरुण परिसरात मोर्णा नदी आणि नाल्यांच्या पुराने शेतीपिकांचे अतोनात नुकसान होऊन शेती मोठ्या प्रमाणात खरडून गेली. कपाशी, तूर, सोयाबीन, ज्वारी, तीळ या पिकांना जगविण्यासाठी मोठा खर्च लागला असून सोयाबीनचे उत्पादन घटल्याने लावलेला खर्च वसूल होत नसल्याची स्थिती आहे. ऑक्टोबर हिटचा जबर तडाखा बसत असल्याने शेतजमिनीला मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या आहेत. दुधाळा, हातरुण, अंदुरा भाग दोन, शिंगोली, मांजरी शेतशिवारात दुपारच्या सुमारास काही भागात कपाशीचे पीक सोकत असल्याचे दिसून येत असून या रोगाचा प्रादुर्भाव झपाट्याने होत असल्याने कापसाचे उभे पीक या रोगाला बळी पडत आहे. या नुकसानाची पाहणी करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. सोकत असलेल्या कापसाच्या पिकासाठी उपाययोजना बाबत मार्गदर्शन करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# विदर्भातील गोड संत्री देशभरातील बाजारपेठा काबीज करेल!

## कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे प्रतिपादन

## विदर्भ विकासात संत्रावर्गीय पिकांचे महत्त्वाचे स्थान

प्रतिनिधी

**अकोला :** विदर्भाची भौगोलिक रचना व जैवविविधता लक्षात घेता फळ पिकांसाठी विशेषतः संत्रावर्गीय पिकांसाठी अतिशय उपयुक्त वातावरण असून, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यांवरदेखील आता परिणामकारक उपाययोजना कार्यान्वित झाल्या. विदर्भातील गोड संत्रा दिल्लीसह राज्यातील इतर बाजारपेठांमध्ये आपले वर्चस्व सिद्ध करून शाश्वत विदर्भाच्या विकासात भरीव योगदान देणार असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांतर्गत कृषी संशोधन केंद्र, अचलपूर व महाराष्ट्र शासन कृषी विभाग, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभावी संत्रा विपणन या विषयावर अचलपूर तालुक्यातील सालेपूर गावच्या आशिष कळमकर यांच्या संत्रा बागेत आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना दिल्ली आणि बंगळुरूच्या बाजारपेठेसाठी लिंबूवर्गीय फळांची काढणी, प्रतवारी, पॅकिंग, मेणाचा लेप आणि वाहतूक करण्याचे प्रशिक्षण नुकतेच मिळाले असून, पर्यायाने त्यांचा आत्मविश्वासदेखील वाढला असल्याचे ते म्हणाले. याच महिन्यात अचलपूरच्या शेतकऱ्यांकडून लिंबूवर्गीय फळांचा एक ट्रक भरून दिल्लीला पाठवण्याची योजना कार्यान्वित होणार असल्याचे सांगितले.



## लिंबूवर्गीय फळेही विविध बाजारात

**पर्यायी दिवशी विविध बाजारपेठांमध्ये लिंबूवर्गीय फळांचा एक ट्रक लोड करण्याची योजना यानिमित्ताने आखत कमी दर्जाची फळे नांदेड येथील सह्याद्री ॲग्रो प्रोसेसिंग युनिटला पाठवली जाणार आहेत.**

यावेळी संत्रा पिकांच्या अनेक समस्यांवर चर्चा करण्यात आली तथा संत्रा फळगळ, फायदेशीर उत्पादन तंत्रज्ञान, बाजारपेठा, प्रक्रिया उद्योग आदींबाबत शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. यामध्ये कृषी विभागासह कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ, विभागप्रमुखांचा समावेश होता. कार्यक्रमास सालेपूर गावचे उपसरपंच रमेश पाटील, संत्रा उत्पादक शेतकरी रवी पाटील यांच्यासह संत्रा उत्पादकांच्या प्रश्नांचे अभ्यासक, तज्ज्ञ संत्रा उत्पादक प्रदीप बंड (जसापूर), नाकट (परतवाडा), राहुल उभाड (भिलोना), संदीप चरपे (तोंडगाव), शेतकरी शास्त्रज्ञांच्या अध्यक्ष आर.जी. राऊत यांच्यासह सालेपूर गावातील प्रतिष्ठित शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

# बीडची जागा महायुतीकडून राष्ट्रवादीलाच!

**डॉ.योगेश क्षीरसागर** | बीड मतदार संघ काढला पिंजून

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महायुतीकडून बीड विधानसभेची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाच सुटणार आणि आपल्यालाच उमेदवारी मिळणार, असा विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा डॉ.योगेश क्षीरसागर यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील दौऱ्याला शुक्रवारी (दि.१८) सुरुवात केली. तत्पूर्वी, त्यांनी शांतिब्रह्म ह.भ.प. नवनाथ बाबांचे आशिर्वाद घेतले.

बीड तालुक्यातील बकरवाडी, मन्यारवाडी, आंबेसावळीसह अनेक गावांमध्ये डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भेटी देत ग्रामस्थांशी संवाद साधला. या दौऱ्यात जि.प.चे माजी सदस्य तथा सरपंच ड.राजेंद्र राऊत, पं.स.चे माजी उपसभापती अरुण लांडे, सरपंच बाबासाहेब पवार, भिकाराम शिंदे, शिवाजी मुंडे, जानकीराम काळे, सखाराम काळे, एकनाथ पवार, रितेश लांडे, सतिश काळे, सिताराम गाडे, पोपट काळे, प्रकाश पोपळे, ज्ञानोबा शिंदे, परमेश्वर शिंदे, सिद्धेश्वर पोपळे, उत्तम शिंदे, माजी सरपंच प्रदीप गुंदेकर,

पान २ वर...





**शिवसनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांची भेट**

बीड तालुक्यातील आंबेसावळी येथे रेडे, डोंगरे परिवाराच्या विवाह सोहळ्यास भेट दिली. तसेच, परमेश्वर गुंदेकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देत यांच्या प्रकृतीविषयी विचारपूस केली. राजेंद्र व महादेव गुंदेकर यांचे वडील स्व.दामोधर गुंदेकर यांचे काही दिवसापूर्वी निधन झाले. त्यामुळे गुंदेकर कुटुंबियांचे सांत्वन केले. ग्रामीण भागाचा दौरा पूर्ण झाल्यानंतर बीडमध्ये महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांची भेट घेतली. ते गेल्या काही दिवसांपासून आजारी असल्याने त्यांची भेट घेत प्रकृतीविषयी विचारपूस केली.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश!

पक्षांतर:धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात केला प्रवेश



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष अलीम शेख तरुणांचा मंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जाहीर प्रवेश झाला. यावेळी धनंजय मुंडे यांनी सर्वांचे पक्षात स्वागत करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी काँग्रेसचे युवक आघाडीचे शहराध्यक्ष अलीम शेख, यांच्यासह शेख रफिक, शेख मोहसीन, शेख मुनीब, इस्माईल, अमन, सिराज सय्यद, सुलतान, आदिल भाई, अदनान , इरफान, लतीफ, रावसाहेब गोरे, नानाजी, फिरदोस रेहान, आसिफ नूर, मुश्ताक, रेहान, इम्तियाज, फरहान, आसिफ, मेहराज अशा अनेक तरुणांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी ज्येष्ठ नेते वाल्मीकांना कराड यांचीही उपस्थिती होती.

# निवडणूक काळात नियमांचे उल्लंघन करु नका

**जिल्हाधिकारी:** नामनिर्देशनावेळी पाच व्यक्ती, तीन वाहनांपर्यंत परवानगी






बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी वाहनांच्या ताफ्यात तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या, वाहनांचा समावेश नसावा. उमेदवाराने नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात, दालनात पाच व्यक्ती व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. तसेच कार्यालयात नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध करण्यात येत असल्याचे जिल्हादंडाधिकारी

पान २ वर...

# लेकीन माहोल बदलणे वाला है!

**जयदत्त क्षीरसागर :**हजारो मुस्लिम कार्यकर्त्यांचा प्रवेश

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

सर्व जातीधर्माच्या लोकांना बरोबर घेऊन राजकारण समाजकारण करणाऱ्या माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना भरघोस मतांनी निवडून देण्याचा संकल्प हजारो कार्यकर्त्यांनी केला आहे,बहुत फडफडा रहा है कबुतर,लेकीन माहोल बदलणे वाला है,दिल को देखो चेहरा न देखो,चेहरेने लाखो को लुटा है हे लक्ष्यात ठेवूनच आगामी काळात मुस्लिम समाज पाठीशी राहील असा विश्वास माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे

बार्शी रोडवर अमन लॉन्स येथे काल रविवारी मुस्लिम कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता, यावेळी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर,फईम सर,पत्रकार काझी मकदुम,नगरसेवक मुखींद लाला,सुलतान बाबा,जमिलभाई,ऍड शेख खाजा बॉस,मैनोद्दीन भाई,सुलेमान पठाण,कलंदर पठाण,कलंदर खान,सिराज खान,नसीर सरपंच, सय्यद मोसीन, रफी भाई,इरफान भाई,शेख पाशाभाई,इसा चौऊस,गुड्डू चौउस,जावेद कुरेशी,आदींची प्रमुख उपस्थिती होती, यावेळी प्रास्ताविक मुखिद लाला यांनी केले,ते म्हणाले की, मुस्लिम समाजासाठीच नव्हे तर पूर्ण शहरासाठी अण्णांनी ज्या ज्या योजनेसाठी निधी उपलब्ध करून दिला त्यांनी त्यांचे कर्तव्य पार पाडले शहर आणि ग्रामीण भागातील विकास कामे करण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले होते सत्ता असो वा नसो त्यांनी आपल्या कार्यालयाचे दरवाजे कधी बंद केले नाहीत किंवा जनतेतील संपर्क कधी कमी केला नाही




पान २ वर...

# संदीप कोतकरांची जिल्हाबंदी उठवली

**दिलासा:**मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय

नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

अ नगरचे माजी महापौर संदीप कोतकर यांची जिल्हाबंदी संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी घेण्यात आली चव्हाण व डेरे या कोर्टासमोर घेण्यात आल्या सुनावणीत संदिप कोतकर यांची जिल्हा बंदी उठविण्यात आली



जिल्हा बंदी उठविण्यात आल्या नंतर माजी महापौर संदीप कोतकर यांचा जिल्हात येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे जिल्हा बंदी उठविण्याचा निर्णय होताच कोतकर यांचा समर्थकांनी शहरात जल्लोष केला आगामी विधानसभा निवडणुकी लढवण्याची तयारी संदिप कोतकर यांनी सुरू केली असल्याची चर्चा मोठ्या प्रमाणात नगर शहरात होत असताना त्यांची जिल्हा बंदी अडचणीची ठरत होती त्यासाठी जिल्हा बंदी उठविण्यासाठी त्यांनी न्यायालयीन लढाई लढावी लागली संदिप कोतकर यांनी निवडणूकीचा रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला तर नगर विधानसभा

पान २ वर...

# सोयगाव तालुक्यात विजांचा कडकडाट

**अस्मानी:** कापूस वेचणी करणाऱ्या महिलांवर कोसळली वीज



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव सह तालुक्यात जरंडी, बनोटी, गोंदेगाव,घोसला आदी परिसरात गुरुवारी सायंकाळी पाच वाजेच्या दरम्यान विजांच्या कडकडाटात मुसळधार पावसाने थैमान घातले होते दरम्यान जरंडी शिवारात कापूस वेचणी करणाऱ्या तीन महिलांच्या अंगावर अचानक वीज कोसळून तीन महिला गंभीर भाजल्याची घटना शुक्रवारी (ता.१८)सायंकाळी साडे पाच वाजेच्या सुमारास घडली आहे

सोयगाव परिसरात शुक्रवारी सायंकाळी विजांच्या कडकडाटात मुसळधार पावसाने शेतातील कापूस भिजला आहे दरम्यान जरंडी शिवारात गट क्र–१५५ मध्ये स्वतःच्या मालकीच्या शेतात कापूस वेचणी करणाऱ्या शोभा बाई रामेश्वर चौधरी(वय ५२) रविना मुकेश चौधरी(वय २७)व योगिता विष्णू वाघ(वय३२ तिन्ही रा–जरंडी) या तिन्ही महिलांच्या अंगावर वीज कोसळून त्या तिघेही भाजल्या आहे त्यापैकी योगिता वाघ व शोभाबाई

पान २ वर...

# महायुतीकडून बीडची जागा राष्ट्रवादीलाच!

**डॉ.योगेश क्षीरसागर:** बीड मतदार संघ काढला पिंजून

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महायुतीकडून बीड विधानसभेची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाच सुटणार आणि आपल्यालाच उमेदवारी मिळणार, असा विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा डॉ.योगेश क्षीरसागर यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील दौऱ्याला शुक्रवारी (दि.१८) सुरुवात केली. तत्पूर्वी, त्यांनी शांतिब्रह्म ह.भ.प. नवनाथ बाबांचे आशिर्वाद घेतले.

बीड तालुक्यातील बकरवाडी, मन्यारवाडी, आंबेसावळीसह अनेक गावांमध्ये डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भेटी देत ग्रामस्थांशी संवाद साधला. या दौऱ्यात जि.प.चे माजी सदस्य तथा सरपंच ड.राजेंद्र राऊत, पं.स.चे माजी उपसभापती अरुण लांडे, सरपंच बाबासाहेब पवार, भिकाराम शिंदे, शिवाजी मुंडे, जानकीराम काळे, सखाराम काळे, एकनाथ पवार, रितेश लांडे, सतिश काळे, सिताराम गाडे, पोपट काळे, प्रकाश पोपळे, ज्ञानोबा शिंदे, परमेश्वर शिंदे, सिद्धेश्वर पोपळे, उत्तम शिंदे, माजी सरपंच प्रदीप गुंदेकर, कुंडलिक बांडे, पवन गुंदेकर, सौरभ गुंदेकर, ज्ञानेश्वर बांडे, जयराम गुंदेकर, व्यंकटेश गुंदेकर, हनुमंत बांडे, मच्छिंद्र बांडे, विश्वंभर नवसागर,

पान २ वर...


# दत्त मंदिराच्या दर्शनाने प्रचाराचा शुभारंभ

**धनंजय मुंडे:**२० नोव्हेंबर रोजी मतातून दाखवून द्या

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

पट्टीवडगाव जिल्हा परिषद गटातील बागझरी येथील दत्त मंदिरात दर्शन घेऊन आरती करत आज धनंजय मुंडे यांनी परळी विधानसभा मतदारसंघात प्रचाराचा शुभारंभ केला आहे. धनंजय मुंडे यांनी सर्वात पहिल्यांदा लढवलेल्या २००२ च्या जिल्हा परिषद निवडणुकीत सुद्धा प्रचाराचा शुभारंभ त्यांनी बागझरीच्या याच दत्त मंदिरात दर्शन घेऊन केला होता. धनंजय मुंडेंच्या प्रत्येक निवडणुकीची सुरुवात बागझरी येथील दत्त मंदिराच्या दर्शनाने होत असते.







मुंडे कुटुंबाच्या दोन पिढ्या तुमच्या सर्वांची सेवा करण्यात गेल्या. आजही आम्हाला सेवेची संधी मिळते ती तुमच्याच आशीर्वादाने, आपण मतदारसंघात विकासासाठी दिलेला प्रत्यक्ष शब्द पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. प्रचंड प्रमाणात विकास निधी खेचून आणला. मात्र देशाचे काही उच्चपदस्थ नेते माझा पराभव करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. परंतु तुम्हीच मला तुमच्या आशीर्वादाने आज पर्यंत इथवर आणले आहे. त्याला तुम्हीच निर्माण केले आज त्यालाच संपवण्याची भाषा केली जात असेल किंबहुना तसे आव्हान दिले जात असेल तर अशा लोकांना २० नोव्हेंबर रोजी मतदानातून तुम्ही दाखवून द्या असे आवाहन यावेळी बागझरी व परिसरातील नागरिकांशी संवाद साधताना धनंजय मुंडे यांनी केले.मी कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही ज्या दिवशी जात बघून किंवा जात दाखवून मतदान मागायची माझ्यावर पाळी येईल त्या दिवशी मी राजकारण सोडून देईल. कोरोना काळात केलेली मदत आठवा त्यावेळी सुद्धा आपण सर्वांना सोबत घेऊन आपल्याकडून जी शक्य ती सर्व मदत केली. तेव्हा आता तुम्ही स्वतः उमेदवार आहेत

पान २ वर...

**पडघम** | अण्णासाहेब राठोडांनी घेतली सुप्रिया सुळेंची भेट

# गेवराईचे निवडणूक वातावरण तापले

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड लोकसभेला गेवराई तालुक्यातीत प्रस्थापित नेते सोबत नसतानाही गेवराई तालुक्यातील शरद पवार गटाच्या उमेदवाराला ३९ हजारांचे मताधिक्य मिळाले यामध्ये अण्णासाहेब राठोड यांचा सिंहाचा वाटा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष यांनी लोकसभेमध्ये तन–मन धनाने पक्षाशी एकनिष्ठ राहत लोकसभेमध्ये तालुक्यातून लीड मिळवून दिली याचा फायदा येत्या विधानसभेमध्ये पक्षाचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांना होईल अशा आशेने बंजारा समाजातील संत महंतांनी मुंबईतील सिल्वर ओक येथे शरदचंद्रजी पवार यांची काही दिवसापूर्वी भेट घेऊन गेवराई ची जागा बंजारा समाजातील राष्ट्रवादी पक्षाचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांना देण्यात यावी अशी मागणी केली. याच अनुषंगाने दि. १८ ऑक्टोबर रोजी तालुका अध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी खासदार सुप्रियाताई सुळे यांची मुंबई येथे भेट घेतली व त्याच बरोबर प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार अमोल कोल्हे यांना भेटून विविध विषयांवर चर्चा केली व गेवराई विधानसभा ची जागा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या तुतारीला सोडून घेण्यात यावे अशी विनंती केली. यावेळी तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांची कार्य अहवाल पुस्तिका सुप्रियाताई सुळे यांना देण्यात आली.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, युती सरकारबद्दल जनतेमध्ये संताप आहे, हे दाखवण्यात शरद पवार यशस्वी ठरले आहे. तसेच, गेल्या दोन वर्षांतील युती सरकारची जनतेचे प्रश्न सोडवण्याबद्दलची तळमळ म्हणावी तितकी दिसून आली नाही, याचा फायदा आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला होणारा असून आत्ताच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये हे चित्र स्पष्ट झाले होते. महाविकास आघाडी मधील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे गेवराई

पान २ वर...

# श्री बंकटस्वामी महाविद्यालयाचे यश

**अभिनंदनिय:**नयन बारगजेला सुवर्णपदक




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

श्री बंकटस्वामी महाविद्यालयाची खेळाडूची नयन अविनाश बारगजे हिने अंतर महाविद्यालयीन सेंटर झोन तायक्वांदो स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. दि. १७ ऑक्टोबर २०२४ रोजी जे.ई. एस.महाविद्यालय जालना येथे पार पडलेल्या अंतर महाविद्यालयीन सेंटर झोन तायक्वांदो स्पर्धेत ५३ कि. ग्रॅ.वजनी गटात सुवर्णपदक प्राप्त केले.

नयन अविनाश बारगजे हिच्या सुवर्ण कामगिरी बद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक मिरगणे, उपप्राचार्य डॉ.शिवाजी मोरे,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. ब्रम्हनाथ मेंगडे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.शंकर धांडे, डॉ.रामराजे आवारे कार्यालयीन अधीक्षक श्री शिवाजी भारती तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

पान २ वर...